दैनिक अहमदनगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ५ वे ● अंक १८५ वा ● गुरुवार, ०९ मे २०२४ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

## सदावर्ते पती-पत्नीची एसटी बँकेच्या संचालक पदावरून हकालपट्टी



**मुंबई :** अ‍ॅड गुणरत्न सदावर्ते आणि त्यांच्या पत्नी अ‍ॅड जयश्री पाटील यांना सहकार खात्याने दणका दिला आहे. स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेतील सदावर्ते दाम्पत्याचे संचालकपद रद्द करण्यात आले आहे.सदावर्ते दाम्पत्य यापुढे एसटी बँकेवर तज्ज्ञ संचालक म्हणून कामकाज करु शकणार नाही, असा निर्णय सहकार विभागाने दिला आहे. एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी ऑक्टोबर २०२३ मध्ये सहकार आयुक्तांकडे (पान ४ वर)

# पाकधार्जिणी काँग्रेस पुन्हा नको

## राष्ट्र, धर्म आणि विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीच हवेत : मुख्यमंत्री



श्रीरामपूर : काँग्रेस हा देशाचा दुश्मन आहे, तो पाकिस्तानची बोली बोलू लागला आहे. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या मांडीला मांडी लावून बसतात. म्हणून हिंदुस्थानमधला प्रत्येक नागरिक पेटून उठला पाहिजे. पाकिस्तान धार्जिणे धोरण घेणाऱ्या काँग्रेसची धुळधाण केली पाहिजे. पुन्हा काँग्रेस उभी राहता कामा नये. असे काम केले पाहिजे, राष्ट्र, धर्म आणि विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी उभे रहा, ही खरी देशभक्ती आहे. असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

शिर्डी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार, खासदार सदाशिव लोखंडे यांच्या प्राचारार्थ बुधवारी (दि. ०८) येथील रासकर नगर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा झाली. तत्पूर्वी मालपाणी लॉन्समध्ये प्रचार सभा झाली. व्यासपीठावर महसूलमंत्री तथा अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, मंत्री दादा भुसे, राष्ट्रवादीचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश आदिक, ज्येष्ठ नेते मधुकरराव पिचड, आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार आशुतोष काळे, माजीमंत्री बबनराव घोलप, माजी खासदार आनंद आडसूळ, माजी आमदार वैभव पिचड, माजी आमदार भानुदास मुरकुटे, यवतमाळ-वाशिम येथील महायुतीच्या उमेदवार जयश्री पाटील, अमोल खताळ-पाटील, कपील पवार, ड. श्रीराज डेरे, कमलाकर कोते, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, नगराध्यक्ष अनुराधा आदिक, सिद्धार्थ मुरकुटे, दीपक पटारे, नितीन दिनकर आदी यावेळी उपस्थित होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शरद पवार म्हणतात, सर्व प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसमध्ये विलीन व्हावे. उबाठाचे पहिल्यापासून काँग्रेसीकरण झालेले आहे. सावरकरांचा अपमान करणाऱ्यांना ते काहीही बोलत नाहीत, ते बाळासाहेबांचे विचार विसरले. बाळासाहेब (पान ४ वर)

### श्रीरामपूरला 'समृद्धी'शी जोडणार

श्रीरामपूर येथील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यासाठी निधी दिला आहे. आता नगर विकास खात्याकडून परवानगी मिळावी तसेच मुख्यमंत्री म्हणून आपण आमच्या पाठीशी उभे राहावे, अशी मागणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. ती मागणी मान्य करताना छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभा राहण्यात कुठलीही अडचणी येणार नाही याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांनी घेतली. त्याचबरोबर श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील ७० गावांना समृद्धी महामार्गाची जोडण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

# लोकसभेपाठोपाठ विधान परिषदेची रणधुमाळी

## मुंबई, कोकण पदवीधर, नाशिक शिक्षक मतदार संघासाठी १० जूनला मतदान

मुंबई : राज्यात लोकसभेची रणधुमाळी संपते न संपते तोच विधानपरिषदेच्या चार जागांवर निवडणूक होत आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. मुंबई आणि कोकण पदवीधर तसेच मुंबई, नाशिक शिक्षक मतदारसंघाची निवडणूक जाहीर झाली आहे. या चार आमदारांचा कार्यकाळ सात जुलै रोजी संपत असून तत्पूर्वी या जागांसाठी १० जून रोजी मतदान होणार आहे.

विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील चार जागांसाठी १० जूनला मतदान होणार आहे. विधान परिषद सदस्यांच्या एकूण सदस्यांपैकी ७ सदस्य शिक्षक, तर ७ सदस्य पदवीधर मतदार संघातून निवडून जातात. दरम्यान दोन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदार संघातील रिक्त होणाऱ्या एकूण चार जागांसाठी निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमानुसार १० जूनला मतदान होणार असून १३जूनला मतमोजणी होईल.

निवडणुकीची प्रक्रिया १५ मे पासून सुरू होणर आहे. इच्छुक उमेदवारांनी २२ मे पर्यंत अर्ज दाखल करता येणार आहे. इच्छुकांनी दाखल केलेल्या अर्जाची छाननी २४ मे रोजी होणार तर आहे. अर्ज मागे घ्यायचा असेल २७ मे पर्यंत उमेदवारांना अर्ज मगे घेता येणार आहे.

### यांचा संपतोय कार्यकाळ

**विलास विनायक पोतनीस - मुंबई पदवीधर (ठाकरे गट)**
**निरंजन वसंत डावखरे - कोकण पदवीधर (भाजप)**
**किशोर भिकाजी दराडे - नाशिक शिक्षक (ठाकरे गट)**
**कपिल हरिश्चंद्र पाटील - मुंबई शिक्षक (लोकभारती)**

पदवीधर मतदार संघातील उमदेवाराला नोंदणी आवश्यक असते. मतदार संघात हजर राहून मतदान करावे लागते. . निवडणूक जाहीर होण्याच्या तीन वर्षाआधी मतदाराने आपला पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.विधानपरिषद निवडणुकीत सर्वात मोठा मुद्दा गुप्त मतदानाचा आहे. राज्यसभेत खुले मतदान असल्याने (पान ४ वर)

# बहीण-भाऊ एक झालात, अगोदर लोकांचे पैसे द्या

## वैद्यनाथ कारखान्यावरुन सोनवणेंचे आरोप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बीड :** तुम्ही बहिण भाऊ एक झालात, अगोदर लोकांचे पैसे द्या असे म्हणत वैद्यनाथ कारखान्यावरून बजरंग सोनवणे यांनी पंकजा मुंडे यांच्यावर खळबळ जनक आरोप केले.

पुढे ते म्हणाले, तुमच्या खासदाराला तुम्ही तुमच्या गावात पाहिलं का? लोकांना न भेटणाऱ्या या दबंग खासदार आहेत. मी परळी विधानसभा मतदारसंघात होतो. जबाबदारीने सांगतो. परळी विधानसभा मतदारसंघातील शिरसाळा भागात फिरत होतो. तेथील लोक सांगत होते, वैद्यनाथ साखर कारखान्याने आमचे पैसे बुडवले. ताईसाहेब लोकांना याची उत्तर द्या. हा पठ्ठ्या प्रत्येक गावात जात आहे. उजळ माथ्याने मी गावात फिरत आहे. तुम्ही म्हणतात की, आंदोलन करणारे लोक अडवतात. आंदोलन करणारे लोक तुम्हाला अडवत नाहीत, तर तुम्ही ज्यांना फसवलं ते लोक तुम्हाला अडवतात. तुम्ही त्यांना दोष देता, ही गोष्ट चुकीची आहे. अरे तुम्ही बहिण भाऊ दोघे (पान ४ वर)

# जनतेच्या हितासाठी माझा आत्मा ५६ वर्षे राज्यात फिरतोय : शरद पवार



श्रीगोंदा : संपूर्ण जगात भारताची आदर्श लोकशाही प्रसिद्ध आहे. ती मोडीत काढून भाजपने हुकूमशाही पद्धतीने राजकीय वाटचाल सुरु केली आहे. हीच हुकूमशाही मोडीत काढण्यासाठी व लोकशाहीला वाचविण्यासाठी सर्व सामान्य जनतेच्या हितासाठी माझा आत्मा ५० नव्हे तर ५६ वर्ष संपूर्ण राज्यात फिरतोय, असा टोला खा. शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना श्रीगोंदा येथील जाहीर सभेत लगावला.

बुधवारी (दि ८ रोजी) अहमदनगर दक्षिण लोकसभा (अहिल्यानगर) मतदार संघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारार्थ संत शेख महंमद महाराज याच्या (पान ४ वर)

### तुम मुझे पाच दीन दो.. मै पाच बरस दुंगा

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहलेली घटना आणि लोकशाही वाचवण्यासाठी शेतकरी व सर्व सामान्य जनतेच्या हितासाठी ही निवडणूक महत्वाची आहे. फक्त घोषणा करायची, प्रत्यक्षात काहीच करायचे नाही. खोटं बोलायचे पण रेटून बोलायचे, अशी अवस्था विखेंची आहे. पाण्याची बाटली दुधापेक्षा महाग असणाऱ्या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा थांबणार.? प्रधानमंत्री हिंदू मुस्लिम वर बोलून जातीय तेढ निर्माण करत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज संभाजी महाराज यांच्या राज्यात बाराबलुतेदार राज्यकारभारात होते. आज अवस्था काय आहे..? कांदा.. दुधाची.. काय स्थिती..? शेतकरी गरीब राहिला पाहिजे. अशी केंद्राची व्यवस्था आहे. विखेंनी मतदार संघात शासकीय मेडिकल कॉलेज, शिक्षण संस्था, रस्ते बनवले नाही. रावणाचाही अहंकार संपलाय तर तुम्ही कोण..? विकासावर बोलणं अपेक्षित आहे. लोकांनी निवडणूक हातात घेतली आहे. त्यामुळे लक्ष्मीच दर्शन होऊनही काय होणार नाही.. श्रीगोंद्याचा ज्वलंत प्रश्न पाण्याचा आहे. ज्याच्यात पाणी आहेना तोच पाणी देऊ शकतो.. सिंचन कार्यालय अहमदनगरला आणनार.. मतदार संघाला पाणी कमी पडू देणार नाही.मी श्रीगोंद्यात जन्मलो आहे.मला श्रीगोंदे करांच्या ऋणातून उतराई व्हायची संधी द्या..तुम मुझे पाच दीन दो.. मै पाच बरस दुंगा असे निलेश लंके यांनी नमुद केले.

### मराठा आरक्षण आंदोलकांची घोषणाबाजी

# दानवेंची प्रचार सभा गुंडाळली

**संभाजीनगर :** मराठा आरक्षण आंदोलकांनी गोंधळ घातल्याने जालना लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारार्थ सिल्लोड तालुक्यातील घाटनांद्रा येथे मंगळवारी रात्री आयोजित सभा अर्ध्या तासातच गुंडाळण्याची नामुष्की आयोजकांवर आली. त्यामुळे उमेदवार रावसाहेब दानवे व अब्दुल सत्तार हे सभेत आलेच नाहीत.

जालना लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारार्थ घाटनांद्रा येथे मंगळवारी रात्री ८ वाजता उमेदवार दानवे आणि अल्पसंख्यांक मंत्री अब्दुल सत्तार यांची प्रचार सभा आयोजित केली होती. रात्री ९ च्या सुमारास सभा सुरू झाली. रात्री ९.३० वाजेच्या सुमारास इतर पाहुण्यांचे सभास्थळी आगमन झाले. त्यानंतर काही तरुणांनी सत्तार व दानवे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली. 'एक मराठा लाख मराठा, अशा प्रकारच्या घोषणा देऊन गोंधळ घालण्यास सुरुवात केली. आत्तापर्यंत रावसाहेब दानवे हे कधीच घाटनांद्रा गावात आले नाहीत. इतरही कोणत्याच सुख, दुःखात ते सामील होत नाहीत, विकास कामे करणे तर दुरचीच गोष्ट आहे, असा संताप यावेळी उपस्थित तरूणांनी व्यक्त केला. यामुळे सभास्थळी एकच गोंधळ उडाला. या तरूणांना काही नेत्यांनी समजावण्याचा प्रयत्न केला; परंतु ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. या गोंधळातच सभेला मार्गदर्शन करण्यासाठी आलेले सिल्लोडचे उपनगराध्यक्ष शेख समीर अब्दुल सत्तार, भाजपाचे तालुकाध्यक्ष अशोक गरुड, माजी जिल्हा परिषद सदस्य कौतिकराव मोरे, दिलीप दानेकर, विजय औताडे, राष्ट्रवादीचे नेते ठगनराव भागवत, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन अर्जुन गाढे आदींनी थोडक्यात भाषण केल्यानंतर अर्ध्या तासातच प्रचार सभा गुंडाळण्यात आली. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर दानवे व सत्तार हे सभास्थळी आलेच नाहीत.

### स्नेहभोजनाचा कार्यक्रम बारगळला

प्रचारसभा झाल्यानंतर आयोजकांनी ग्रामस्थांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यानुसार स्वंयपाकही तयार करण्यात आला होता; परंतु सभास्थळी गोंधळ झाल्याने आयोजकांना अर्ध्या तासातच सभा गुंडाळावी लागली. त्यामुळे स्नेहभोजनाचा कार्यक्रमही बारगळला बहुतांश ग्रामस्थांनी स्नेहभोजनाकडे पाठ फिरवली.

# मराठा आरक्षणाच्या कारणावरून विद्यार्थ्याची आत्महत्या


**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नांदेड :** मराठा समाजातील नीटची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना कुणबी आरक्षण मिळाले नसल्यामुळे त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना लोहा तालुक्यातील मौजे धानोरा (शे.) येथे घडली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, विद्यार्थी प्रमोद जानकीराम भुजबळ (वय १९) याने आत्महत्या करण्यापूर्वी चिठ्ठीत लिहले की, मराठा समाजाला कुणबी आरक्षण नसल्यामुळे त्यांने नीटची परीक्षा देऊनही मार्क कमी आले तर, तो पात्र ठरवू शकत नाही. म्हणून तो त्याचे जीवन संपवित आहे, म्हणून यावर सर्व समाजाला त्याची शेवटची विनंती आहे. मनोज दादा जरांगे यांना साथ द्यावी, अशी विनंती केली आहे. आत्महत्या केलेल्या प्रमोद जानकीराम यांच्या पश्चात आई, आजोबा, दोन चुलते, भाऊ असा परिवार आहे.

प्रमोद जानकीराम भुजबळ यांनी आत्महत्या केल्याचे वृत्त समजताच नांदेड दक्षीणचे आमदार मोहन अण्णा हंबर्डे यांनी तीव्र दुःख व्यक्त करून धानोरा (शे.) येथे जाऊन मृत प्रमोद जानकीराम भुजबळ यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचें सांत्वन केले.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीनिवास मोरे, मयत प्रमोद जानकीराम भुजबळ यांची आई विजेत्याला जानकीराम भुजबळ, आजोबा लक्ष्मण भिवाजी भुजबळ, चुलता मोतीराम लक्ष्मण भुजबळ, चुलता सुरेश लक्ष्मण भुजबळ, भाऊ प्रदीप जानकीराम भुजबळ, सरपंच खुशाल भुजबळ, पोलिस पाटील बालाजी भुजबळ आदी उपस्थित होते.




# हजार कोटींचा ॲम्ब्युलन्स घोटाळा शिंदे सरकारच्या मानगुटीवर!

## 'सुमित' व 'बीव्हीजी' कंपन्यांना कोर्टाचा दणका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** निवडणुकीच्या धामधुमीत म्बुलन्स घोटाळा पुन्हा एकदा चर्चे त आला. हायकोर्टाने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर राज्य सरकारसह इतर अप्रतिवाद्यांना नोटीसा बजावल्या असून चार आठवड्यातच उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे हजार कोटींचा म्बुलन्स घोटाळा शिंदे सरकारच्या मानगुटीवर बसला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारातही ॲम्ब्युलन्स घोटाळा चर्चेत येत आहे. या प्रकरणाची 'फाइल' राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) आमदार रोहित पवारांनी मीडियासमोर आणली होती. पण त्यानंतरही राज्याच्या आरोग्य खात्याने ठेकेदारांची बाजू घेत, या टेंडरमध्ये कोणतीही अनियमितता झाली नाही. टेंडरच्या रकमेत फुगवटा नाही, असे स्पष्टीकरणही दिले.

ठेकेदार कंपन्यांना नवा पैसाही ॲडव्हान्स दिलेला नाही, असा खुलासाही आरोग्य खात्याने केला होता. मात्र, आता मुंबई हायकोर्टानेच याची दखल घेतल्याने लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात 'ॲम्ब्युलन्स घोटाळा' सत्ताधाऱ्यांच्या मानगुटीवर बसला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

हायकोर्टाने जनहित याचिकेवर राज्य सरकारसह इतर प्रतिवाद्यांना नोटीस बजावली असून पुढील चार आठवड्यांत त्यावर उत्तर देण्याचे आदेश मंगळवारी दिले आहेत. कोर्टाने या प्रकरणाची दखल घेतल्याने आता राज्य सरकार आणि आरोग्य विभागाच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य सरकार कोर्टात काय उत्तर देणार, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

बडे राजकारणी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत 'सेटिंग' पुण्यातील सुमित फॅसिलिटीज आणि 'बीव्हीजी' या कंपन्यांनी १० हजार कोटी रुपयांचे 'ॲम्ब्युलन्स' पुरवठ्याचे टेंडर घेतले.सुमित फॅसिलिटीजलाच हे टेंडर मिळावे, याकरिता सत्ताधाऱ्यांमधील प्रमुखांनी प्रचंड उठाठेवी केल्या आणि आरोग्य खात्याचे कमिशनर धीरज कुमारांना टेंडरचे नियम बदलण्यासही भाग पाडले. या टेंडरची मूळ किंमत जवळपास दुप्पटीने कशी फुगवली, सुमित आणि 'बीव्हीजी'च्या फायद्यासाठी आधी प्रीबिड मीटिंग घेतली नाही, टेंडरच्या फाइलवर खाडाखोड कशी आणि कोणी केली, हे फसवणुकीचे सारे प्रकार सर्वप्रथम 'सरकारनामा'ने उजेड आणले. याबाबत 'सरकारनामा'ने केलेल्या 'इन्व्हेस्टिगेशन' नंतर वठणीवर आलेल्या धीरज कुमार आणि त्यांच्या आरोग्य खात्याने टेंडर नियमाप्रमाणेच काढल्याचा आव आणला.

टेंडर मुदतवाढ दिली, त्यात प्रीबिड मीटिंग घेतली, विशेष बाब म्हणून घाईगडबडीने टेंडर मंजूर केल्याचेही दिसून आले. सुमित आणि 'बीव्हीजी' ला मिळालेल्या टेंडरमध्ये शेकडो कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे उघड होताच पुण्यातील विकास लवांडे यांनी हायकोर्टात जाऊन याचकि दाखल केली. त्यावरून हायकोर्टाने 'ॲम्ब्युलन्स' घोटाळ्यावरून शिंदे-फडणवीस-पवार सरकारकडून खुलासा मागितला आहे. त्यामुळे टेंडर 'मॅनेज' करवून ते सुमित आणि 'बीव्हीजी'च्या घशात घालणाऱ्या या सरकारची डोकेदुखी वाढणार आहे. तर या दोन्ही ठेकेदार कंपन्यांचीही झोप उडणार आहे.

## संपादकीय

# शिक्षण हक्क-भंग तूर्तास टळला!

शिक्षण हक्क कायद्याबाबत उद्दिष्टाशी विपरीत नियम करता येणार नाही, हे प्राथमिक सुनावणीच्या वेळीच उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. आपल्या देशात शिक्षण हक्क कायदा (आरटीई) आला, त्याला आता १५ वर्षे झाली. मुळात शिक्षण हा मूलभूत अधिकार असताना त्याच्या अंमलबजावणीसाठी कायदा करावा लागला आणि हा कायदा लागू झाल्यापासून त्याची उत्तम अंमलबजावणी करण्यापेक्षा त्यातील तरतुदी आणि नियमांत पळवाटा काढण्याचेच प्रयत्न सातत्याने झाले. राज्य सरकारने फेब्रुवारीत केलेला असाच एक नियमबदलाचा प्रयत्न सध्या तरी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे हाणून पाडला गेला आहे. 'आरटीई'नुसार, वंचित वर्गातील मुलांसाठी सर्व शाळांत २५ टक्के जागा राखीव ठेवणे बंधनकारक आहे. या जागांवर या मुलांना विनामूल्य प्रवेश आणि शुल्कमाफी आहे. या शुल्काची प्रतिपूर्ती करण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. राज्य सरकारने फेब्रुवारीत एक अधिसूचना काढून या नियमात बदल केला. ज्या खासगी, विनाअनुदानित वा स्वयंअर्थसहायित शाळांच्या एक किलोमीटर अंतराच्या परिसरात सरकारी किंवा अनुदानित शाळा असतील, त्या शाळांना 'आरटीई'अंतर्गत वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्याचे बंधन नसेल, असा हा नियमबदल. सोप्या भाषेत सांगायचे, तर ज्यांच्या एक किलोमीटर परिसरात कोणतीही सरकारी वा अनुदानित शाळा असेल, अशा सर्व खासगी शाळांना २५ टक्के कोट्यापासून मुक्ती देणारा निर्णय सरकारने घेतला. या नियमबदलाने २५ टक्के कोट्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी खासगी शाळांची दारेच बंद करण्यात आली होती. प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात पोहोचले तेव्हा या नियमबदलाला पुढील आदेशापर्यंत स्थगिती मिळाली. राज्य सरकारला बाजू मांडणारे प्रतिज्ञापत्र सादर करायला सांगून न्यायालयाने पुढील सुनावणी १२ जूनला ठेवली. त्या सुनावणीत व्हायचे ते होईल. पण आजघडीला दोन कारणांसाठी या घडामोडीचे स्वागत.

पहिले कारण म्हणजे, राज्य सरकारच्या विरोधात अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा आणि काही पालकांनी मुंबई उच्च न्यायालयात केलेल्या याचिकेची दखल न्यायालयाने सत्वर घेतली. दुसरे म्हणजे, स्थगिती देताना न्यायालयाने ज्या बाबींचा विचार केला त्या महत्त्वाच्या आहेत. 'सरकारी किंवा अनुदानित शाळा जवळ नसेल, तरच खासगी शाळांना 'आरटीई'अंतर्गत २५ टक्के जागा राखीव ठेवण्याची अट असेल, असे मूळ कायद्यात म्हटलेले नाही. मूळ कायद्याचे उल्लंघन होईल, अशा प्रकारचा कोणताही दुय्यम कायदा करता येऊ शकत नाही, हे कायद्याचे प्रस्थापित तत्त्व आहे. मात्र, नव्या तरतुदींमुळे बालकांच्या प्राथमिक शिक्षण घेण्याच्या अधिकारावर गदा येते,' असे नमूद करून न्यायालयाने ही अंतरिम स्थगिती दिली आहे.

मुळात या सगळ्या विषयाची चर्चा सुरू झाली होती, ती फेब्रुवारीत झालेल्या नियमबदलानंतरच. मात्र, त्याला खरी वाचा फुटली, ती 'आरटीई'अंतर्गत असलेल्या २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशअर्ज प्रक्रिया सुरू झाल्यावर. ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात असतानाही, उपलब्ध जागांच्या तुलनेत यंदा अत्यल्प अर्ज आले. खासगी आणि विनाअनुदानित शाळांतील प्रवेशाला आडकाठी निर्माण झाल्याने अर्जांच्या संख्येवर परिणाम झाल्याचे स्पष्टच दिसत होते. शिक्षण हक्क कायदा लागू झाल्यापासून खासगी आणि विनाअनुदानित शाळा सातत्याने या विशिष्ट नियमापासून पळवाट काढण्याचा प्रयत्न करत आहेतच. शिक्षण हक्क कायदा ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी असल्याने कसा पहिलीपासून पुढे लागू होतो आणि कसा पूर्वप्राथमिक प्रवेशाला लागू होत नाही, असा तांत्रिक मुद्दा काढून अगदी सुरुवातीला काही खासगी संस्था भांडत होत्या. बहुतांश खासगी शाळांत पूर्वप्राथमिक स्तरावर प्रवेश घेतलेल्यांनाच पुढे पहिलीला प्रवेश मिळतो, हे वास्तव लक्षात घेतल्यास शक्यतो हा २५ टक्के राखीव जागांचा नियम आपल्याला लागूच कसा होणार नाही, यासाठीची ही तयारी होती. त्यामुळे शाळाप्रवेशाच्या पहिल्या टप्प्यावर हा नियम लागू असेल, अशी स्पष्टता आणावी लागली. गेल्या फेब्रुवारीमध्ये राज्य सरकारने जो नियमबदल केला, त्यालाही खासगी शाळांचीच एक तक्रार कारणीभूत ठरली. वंचित वर्गातील मुलांच्या शुल्काची प्रतिपूर्ती राज्य सरकारकडून केली जाते. मात्र, या प्रतिपूर्तीची थकबाकी सुमारे २४०० कोटी रुपये आहे. यामुळे खासगी शाळांनी आपले अर्थकारण कोलमडत असल्याचे गाऱ्हाणे सातत्याने मांडले. वास्तविक ही थकबाकी भरण्यासाठी आर्थिक तरतूद करणे अपेक्षित असताना, राज्य सरकारने नियमबदलाची पळवाट काढली. आता या नियमबदलामागे खासगी शाळा चालविणाऱ्या संस्थांमागच्या राजकीय प्रेरणाही आहेतच. अनेक खासगी शिक्षण संस्था प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कोणत्या राजकीय नेत्यांच्या मालकीच्या आहेत, हे नव्याने सांगायची गरज नाही. ग्रामीण भागातील अशा काही खासगी इंग्रजी शाळांत तर अजबच स्थिती. तेथे विद्यार्थिसंख्या किती येईल, हा विचार न करता, सरसकट मान्यता दिल्या गेल्या. त्यामुळे अनेक ठिकाणी तर फक्त २५ टक्के कोट्यातील प्रवेश करून, त्याबदल्यात सरकारकडून प्रतिपूर्ती शुल्क घेऊन शाळा चालवायच्या, असेही प्रकार होतात.

शिक्षण या विषयाबद्दल सरकारी पातळीवर एकूणच किती अनास्था आहे, याचेच हे द्योतक. सरकारने खासगी शाळांचे गाऱ्हाणे ऐकले. पण ज्या वंचित वर्गातील मुलांना २५ टक्के आरक्षणामुळे खासगी शाळांतील शैक्षणिक सुविधा मिळू शकतात त्यांचा विचारच कसा केला नाही? समाजात सामीलकीची भावना निर्माण व्हावी आणि त्याची प्रक्रिया 'आरटीई' कायद्यातील तरतुदींनी सुरू व्हावी, असा 'आरटीई' कायद्याचा व्यापक उद्देश आहे. जागतिकीकरणोत्तर काळात तर याची निकड अधिकच आहे. पण सरकार ज्या पद्धतीचे नियमबदल किंवा सुधारणा करते, त्यामुळे सरकारने सामाजिक- आर्थिक विषमतेसारखा संवेदनशील विषय 'ऑप्शन'ला टाकला आहे की काय, असा प्रश्न पडतो. खासगी, विशेषत: इंग्रजी शाळांच्या शुल्काचा विचार केला, तर वर्षाकाठी घेतले जाणारे काही लाख रुपयांचे शुल्क मध्यमवर्गीयांनाही परवडणे दुरापास्तच. मात्र त्या वर्गातले पालक प्रतिष्ठेच्या नावाखाली किंवा आपल्याच पाल्याचे शैक्षणिक नुकसान होईल या भीतीपायी, या अवाजवी शुल्काविरोधात आवाज उठविण्यास कचरतात. शिवाय भरमसाट शुल्क असलेल्या शाळांत इतर काही नाही, तरी सहाध्यायींची 'चांगली सोबत' मिळते, असे मानणाराही हाच पालकवर्ग आहे. या वर्गाला २५ टक्के कोट्यातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या मुलांबरोबर शिकणे मान्य नाही. 'आम्ही एवढे पैसे भरायचे आणि हे फुकट शिकणार,' असा त्यातला आव आहे, त्यामागील सामाजिक उद्दिष्टांचे मात्र भान नाही. बरे, हे शुल्क आकारले जाते त्यात काही मूलभूत सुविधांव्यतिरिक्त इतर अनेक अशा गोष्टी असतात. ज्या खरोखरच किती 'शैक्षणिक' असतात असा प्रश्न पडावा. अमुक एका कापडाचा अमुक एका दुकानातूनच गणवेश शिवण्याचा वा विकत घेण्याचा आग्रह इथपासून शाळेच्या 'प्रचार-प्रसारा'साठी नेमल्या जाणाऱ्या खासगी जनसंपर्क संस्थांपर्यंतचा खर्च खरेच किती 'शैक्षणिक' असतो? स्नेहसंमेलनात मुलांच्या विविध गुणदर्शनाऐवजी हिंदी चित्रपटसृष्टीतील गायक-गायिकेचा कार्यक्रम ठेवण्यापर्यंतचा भपकेबाजपणा करणाऱ्याही काही खासगी शाळा आहेत. अशा खर्चांचा आणि प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापनावर होणाऱ्या खर्चांचा काही तरी ताळमेळ असावा की नाही? शुल्क प्रतिपूर्तीची अपेक्षा करताना या सगळ्याचा खर्चही 'शैक्षणिक' खर्चात समाविष्ट केला गेला, तर सरकार त्याची प्रतिपूर्ती करायला पुरे पडेल की नाही, या प्रश्नाचे तर उत्तर शोधण्याचीही गरज नाही!

# सुजय विखे यांच्या प्रचारार्थ राहुरी शहरातून भव्य रॅली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** महायुतीचे उमेदवार खासदार सुजय विखे यांच्या प्रचारार्थ राहुरी शहरात भव्य दिव्य अशी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रचारफेरीत नागरिकांनी श्रीरामचंद्रांचे उपरणे सुजय दादा विखे व शिवाजीराव कर्डिले यांना देऊन त्यांचा सन्मान केला. शहरात ठीक ठिकाणी भगवे झेंडे लावण्यात आले होते

रॅली ची सुरुवात राहुरी कृषी उत्पन्न बाजार समिती पासून झाली त्यामध्ये माजी आमदार शिवाजीराव कर्डिले हे सहभागी झाले होते खासदार सुजय विखे व शिवाजीराव कर्डिले यांचे कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात स्वागत करून रॅलीची सुरुवात झाली यावेळी भगव्या टोपे भगव्या उपरणे याचा पेहराव करून कार्यकर्त्यांनी सर्व शहर भगवे करून टाकले होते.

रॅली ची सुरुवात कृषी उत्पन्न बाजार समिती पासून होऊन नगर मनमाड रोडने शुक्लेश्वर चौक शिवाजी चौक शनी मंदिर चौक येथून नव्या पेठेत जुन्या सरकारी दवाखान्यापाशी सभा स्थळ उभारलेले होते सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ राज्याचे कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे यांची सभा आयोजित केली होती. राहुरी शहरवासीयांकडून या रॅलीचे ठिकठिकाणी स्वागत करून तयार रॅलीवर फुलांची पुष्पवृष्टी करण्यात आली होती व श्री प्रभू रामचंद्राच्या नावाचा गजर करीत रॅली हळूहळू पुढे सरकत होती रॅली शनी मंदिरा जवळ आल्यानंतर खासदार सुजय विखे व शिवाजीराव कर्डिले यांनी शनी मंदिरात जाऊन दर्शन घेतले व रॅलीचे राहुरीतील नव्या पेठेत सभास्थळी आगमन झाले . रॅलीमध्ये शनी मंदिराजवळ जेसीबी ला लावलेला मोठा पुष्पहार नागरिकांचे लक्ष वेधून घेत होता. दरम्यान सुजय विखे यांच्या प्रचारार्थ या सभेस मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे सभेसाठी अभूतपूर्व अशी नागरिकांनी गर्दी केली होती नामदार मुंडे आता नेमके काय बोलणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मंदिरे पडणाऱ्यांचे लंकेंना समर्थन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर :** नगर मध्ये झालेल्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाविकास आघाडी सत्तेसाठी हिंदू विरोधी ताकतींना एकत्र करत असल्याचे सांगत होते. त्याची प्रचिती नगर जिल्ह्यात पहायला मिळाली. अहिल्यानगरच्या निवडणूकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार निलेश लंके हे हिंदू द्रोहीच्या समर्थनासाठी लोळवण करत असल्याचे समोर आले आहे. नगरमधील छत्रपती नगर परिसरात हनुमान जयंतीच्या आदल्या दिवशी शनी मंदिर आणि हनुमानाचे मंदिर पाडणारे नवनागापूरचे सरपंच आणि शरद पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष बबन डोंगरे यांचे समर्थन लंके यांनी मिळवले असून प्रचारासाठी त्यांना घेवून फिरत आहेत. यामुळे हिंदू बांधवांमध्ये संतापाची लाट पहायला मिळत आहे.

देशात इंडीया आघाडीकडून सत्ता मिळविण्यासाठी हिंदू विरोधी संघटनांची मतद घेतली जात असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले होते आणि नगरमध्ये ही घटना उघड झाली. सत्तेसाठी अजितदादा पवार यांच्या पाठीत खंजीर खुपसून शरद पवार गटात आलेले महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके अशा हिंदू विरोधी वृत्तीला पाठिंबा देत त्यांचे निवडणुकीत त्यांचे समर्थन मिळवत आहेत.

नवनागापूर येथील ग्रामपंचायतचे सरपंच बबन डोंगरे यांनी लोकांची आस्था असलेले गावातील शनी आणि हनुमानाचे मंदिर गावकऱ्यांचा विरोध असतानाही जेसीबीच्या सहाय्याने उधवस्त केले होते. गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार ही त्यांची पहिलीच वेळ नसून या अगोदर त्यांनी गावातील दत्त मंदिराचे सुद्धा नुकसान केल्याची गावकऱ्यांनी दिली. ज्यावेळी डोंगरे यांनी मंदिर पाडण्याचा घाट घातला होता. त्यावेळी गावकऱ्यांनी त्यांना प्रचंड विरोध केला होता. पण गावकऱ्यांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी ही मंदिरे पाडली होती. यावेळी सकल हिंदू संघटनांनी त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. पण स्थानिक पारनेर- नगरचे आमदार यांनी त्यांना मदत केल्याचे गावकरी सांगत आहेत.

आता लोकसभा निवडणुकीत पुन्हा निलेश लंके यांनी या डोंगरेंना आपल्या हाताशी घेतले असून त्यांच्या घरी गुप्त बैठका घेवून कट रचले जात असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. गावात डोंगरे यांच्या विरोधात संतप्त वातावरण असताना लंके हिंदू विरोधी लोकांना आपल्या कळपात ठेवत असल्याने लंके यांच्या विरोधात गावात वातारण निर्माण झाले आहे.

# महाविकास आघाडीचे राज्यात ३० पेक्षा जास्त खासदार निवडून येणार: तांबे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** महाविकास आघाडीचे राज्यात ३० पेक्षा जास्त खासदार निवडून येणार असल्याचे प्रतिपादन मा आ सुधीर तांबे यांनी केले. तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी /इंडिया आघाडीचे उमेदवार मा खा भाऊसाहेब वाकचौरे यांना लाखोंच्या मताधिक्याने निवडून दया, असे प्रतिपादन जिल्हा बँकेचे संचालक, मा उपनगराध्यक्ष करण ससाणे यांनी केले आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांच्या प्रचारार्थ आयोजित कार्यकर्त्यांच्या संवाद मेळाव्याप्रसंगी ससाणे बोलत होते. यावेळी मेळाव्याचे अध्यक्ष काँग्रेसचे शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर होते . यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांनीही मतदानरुपी आशीर्वाद देण्याचे आवाहन केले. ससाणे पुढे म्हणाले की, सर्वसामान्य शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी, खाजगीकरण, न्यायव्यवस्थेतील दबावतंत्र, फोडाफोडीचे राजकारण, सत्तेचा गैरवापर, यामुळे देशात भाजपा विरोधी लाट निर्माण झाली आहे. त्यामुळे कोणत्याही भूलथापांना बळी न पडता देशाची लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी भाऊसाहेब वाकचौरे यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून, एकदिलाने काम करा. यानंतर मा.नगराध्यक्ष संजय फंड म्हणाले की, देशाचे पंतप्रधान जनतेशी खोटे बोलून दिशाभूल करीत असून, देशात भाजपाच्या अनागोंदी कारभारामुळे अस्थिरता निर्माण झाली आहे. त्यामुळे मोदींचे हुकूमशाही सरकार जनता घरी बसवल्याशिवाय राहणार नाही, अशी घनाघाती टीकाही फंड यांनी केली. यानंतर जी.प.चे माजी सभापती बाबासाहेब दिघे म्हणाले की,लोकशाही संपवणे हीच मोदीची गॅरंटी असून महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प गुजरातला पळवून ईडी, सीबीआय या यंत्रणांच्या माध्यमातून विरोधी पक्षांना धमकवण्याचे काम करत आहे. त्यामुळे महायुतीचे सरकार जनतेला मान्य नाही. यानंतर श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले म्हणाले की,भाजपा धर्माचे राजकारण करत असून जाती जातीमध्ये वाद निर्माण करत आहे. देशात काँग्रेसची लाट निर्माण झाली असून राहुल गांधी यांचे हात बळकट करण्यासाठी भाऊसाहेब वाकचौरे यांनाच प्रचंड बहुमताने विजयी करा. यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस हेमंत ओगले म्हणाले की, महायुतीचे खासदार मतदारसंघात कधी फिरकले नाही.




# पालिकेच्या एन. यु .एल. एम. विभागामार्फत मतदार जनजागृती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** लोकसभा निवडणूक २० २४ अनुषंगाने शिर्डी लोकसभा मतदारसंघ अंतर्गत शहरातील मतदारांमध्ये मतदान टक्केवारी वाढवावी व मतदारांचा उत्साह वाढवावा यासाठी प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत स्थापन केलेल्या बचत गटामार्फत शहरात जनजागृती अभियान राबविण्यात आले. शहरातील बचत गटामार्फत गोंधवणी, संजय नगर, गिरमे चौक, रेव्हेन्यू कॉलनी, नॉर्दन ब्रांच दहावा ओटा, जर्मन हॉस्पिटल परिसर, पंचायत समिती परिसर, गार्डन, लोकमान्य टिळक वाचनालय, अक्षय कॉर्नर, मॉडेल इंग्लिश स्कूल, कांदा मार्केट, बाजार तळ ,कर्मवीर चौक आदी भागांमध्ये महिला बचत गटांची जनजागृती रॅली मतदारांचे प्रबोधन चर्चेच्या माध्यमातून करण्यात आली. यावेळी बचत गटाद्वारे रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, तसेच सहभागी व गटातील सदस्यांना बक्षीस वितरित करण्यात आले. मतदार जनजागृती कार्यक्रमात शहरातील जवळपास ११० बचत गटातील १०५० महिला सहभागी झाल्या तसेच मुक्त, निपक्ष, निर्भयपणे ,लोकशाही वर निष्ठा ठेवून व धर्म, वंश, जात समाज भाषा यांच्या प्रभावाखाली न येता कोणतेही प्रलोभनास बळी न पडता मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्याबाबत शपथ देण्यात आली. हा कार्यक्रम प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव ,उपमुख्य अधिकारी आयुब सय्यद ,शहर अभियान व्यवस्थापक स्वाती निरगुडे, रेखा चाठे ,समूह संघटक वर्षा पाठक ,हरीश पैठणे यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली पार पडला.

# सायबर चोरट्यांकडून महिलेची २ कोटींची फसवणूक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** सायबर चोरट्यांनी कोरेगाव पार्क भागातील एका ज्येष्ठ महिलेची दोन कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत एका ज्येष्ठ महिलेने फिर्याद दिली आहे. २६ एप्रिल रोजी ज्येष्ठ महिलेच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्याने संपर्क साधला. फेडेक्स कुरिअर कंपनीच्या कार्यालयातून आकाशकुमार बोलत असल्याची बतावणी चोरट्याने केली. मुंबई विमानतळावर फेडेक्स कुरिअर कंपनीकडून पाठविण्यात आलेले पाकिट सीमाशुल्क विभागाने (कस्टम) जप्त करण्यात आले आहे. पाकिट अमली पदार्थ सापडले असून, याप्रकरणी मुंबईतील अमली पदार्थ विभागात (नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो) गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाई टाळायची असेल तर एक प डाऊनलोड करा, असे चोरट्याने सांगितले. बँक खात्याची माहिती चोरट्याने घेतली. बँक खात्याची माहिती पडताळण्यासाठी तुमच्या खात्यातील सर्व पैसे माझ्या खात्यात पाठवा, अशी बतावणी चोरट्याने केली.

चोरट्याच्या सांगण्यावरुन महिलेने चोरट्याच्या खात्यात दोन कोटी ८० हजार रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदविली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक मीनल सुपे-पाटील तपास करत आहेत.

केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय), नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो, सक्त वसूली संचलनालय (ईडी) अशा तपास यंत्रणांकडून कारवाई करण्यात येणार असल्याची भिती दाखवून चोरट्यांनी आतापर्यंत नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून अशा प्रकारची फसवणूक करण्याचे गुन्हे वाढीस लागले असून, नागरिकांनी अनोळखी क्रमांकावरुन आलेल्या दूरध्वनीला प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# भाव गडगडल्याने कांदा उत्पादकांचा पारनेरात उद्रेक

## बाजार समितीतील लिलाव बंद पाडले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** रविवारी मिळालेल्या भावाच्या तुलनेत कांद्याचे भाव प्रति क्विंटल १ हजार ते बाराशे रुपयांनी गडगडल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी बुधवारी पारनेर बाजार समितीतील कांद्याचे लिलाव बंद पाडले.यावेळी शेतकऱ्यांनी मोदी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.मोदी हटाव, शेतकरी बचाव, शेतकरीविरोधी सरकारचा निषेध असो अश्या घोषणा यावेळी बाजार समितीच्या कार्यालयासमोर जमलेल्या शेतकऱ्यांनी दिल्या.

यावेळी बाजार समितीचे उपसभापती बापूसाहेब शिर्के तेथे उपस्थित होते.त्यांनी शेतकऱ्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.मात्र शेतकरी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते.त्यानंतर संतप्त शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयाकडे मोर्चा वळवला.कांद्याला योग्य भाव मिळावा यासाठी तहसिलदारांच्या दालनासमोर धरणे आंदोलन सुरू केले.

दरम्यान शनिवारी (दि.४ मे ) केंद्र सरकारने कांदा निर्यातीवरील बंदी हटवल्याचे जाहीर केले.त्यानंतर संपूर्ण राज्यात कांद्याच्या भावात वाढ झाली. त्यामुळे उत्पादकांनी मोठ्या प्रमाणावर कांदा आजच्या लिलावात विक्रीसाठी आणला होता. दुपारी १ वाजेपर्यंत बाजार समितीच्या आवारात २५० पेक्षा अधिक गाड्या कांद्याची आवक झाली होती. मात्र केंद्र सरकारने निर्यातशुल्कासह किमान निर्यातदर निश्चित करून निर्यातीस परवानगी दिली असल्याने इतर कांदा निर्यातदार देशांच्या तुलनेत भारतीय कांद्याचे दर मोठ्या प्रमाणावर वाढले. त्यामुळे कांदा निर्यातीवर मर्यादा आल्या.परिणामी दोन दिवसांपूर्वी वाढलेले दर गडगडले.

केंद्र सरकारच्या परकीय व्यापार महासंचालनालयाने (डीजीएफटी) जारी केलेल्या परिपत्रकात निर्यातशुल्काचा उल्लेख नसून, कांद्याचे निर्यातमूल्य ५५० डॉलर प्रतिटन असल्याचे नमूद केले आहे. तत्पूर्वी केंद्रीय अर्थमंत्रालयाने शुक्रवारी (दि. ३) राजपत्र जारी करीत त्यात कांद्यावर ४० टक्के निर्यातशुल्क असल्याचे नमूद केले आहे.या दोन्ही बाबींमुळे कांद्याचे निर्यातमूल्य ६७ रुपये प्रतिकिलोवर पोहोचले आहे. इतर कांदा निर्यातदार देशांनी कांद्याचे दर कमी केल्याने महागात पडणारा भारतीय कांदा कोण खरेदी करणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. डीजीएफटीच्या परिपत्रकात केवळ निर्यातमूल्यांचा उल्लेख असणे आणि अर्थमंत्रालयाच्या राजपत्रात कांद्यावरील ४० टक्के निर्यातशुल्क कायम असल्याचे नमूद करणे हा घोळ कांदा निर्यातीच्या इतिहासात पहिल्यांदाच झाला आहे.

# रात्री उशिरापर्यंत बँक चालू ठेवणे पडले महागात; व्यवस्थापकावर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** वेल्ह्यातील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा रात्री उशिरापर्यंत सुरु ठेवल्याप्रकरणी बँक व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत रमेश अजिनाथ बेलेकर (वय ३५, रा. नसरापूर, ता. भोर. जि. पुणे) यांनी वेल्हे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी बँक व्यवस्थापक विनायक तेलावडे यांच्याविरुध्द आदेशाचा भंग केल्याप्रकरणी (भादंवि १८८) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रमेश बेलेकर वेल्ह्यात कृषी सहायक आहेत. त्यांची निवडणूक आयोगाकडून वेल्हे तालुक्यात भरारी पथकाचे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भरारी पथकातील बेलेकर, तुषार तडवी आणि सहकारी सोमवारी पहाटे चारच्या सुमारास गस्त घालत होते.

> रोहित पवार यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची वेल्हे शाखा रात्री बारानंतर सुरू असल्याची माहिती समाजमाध्यमातून दिली. त्यानंतर भरारी पथक तेथे पोहोचले.

भरारी पथकाने तेथे पाहणी केली. तेव्हा बँक व्यवस्थापकांच्या दालनाच्या बाहेर ४० ते ५० जण थांबले होते. त्यानंतर भरारी पथकाने बँक व्यवस्थापक तेलावडे यांच्याशी संपर्क साधला. बँकेतील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासायचे असल्याचे भरारी पथकाकडून सांगण्यात आले. त्यानंतर बँकेचे विभागीय अधिकारी प्रकाश गायकवाड यांनी सीसीटीव्ही चित्रीकरण तपासण्यास परवानगी दिली. सीसीटीव्ही चित्रीकरणात ४० ते ५० जण बँकेत आढळून आले. बँकेची वेळ संपल्यानंतर मध्यरात्रीनंतर बँक सुरू ठेवली, तसेच आदेशाचा भंग केल्याप्रकरणी बँक व्यवस्थापक तेलावडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)- ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय- कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहमदनगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले. संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Bahasaheb Nawale To be Printed At Saived Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahmednagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor, Near New Court, Shrirampur, Dist. Ahmednagar, Maharashtra 413 709, India Editor : Karan Babasaheb Nawale" RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com, Email ID- rashtrasahyadri @ gmail.com. Mo. 7774001818

# गरीबाचे कैवारी म्हणून फिरणाऱ्यांनी कोणता विकास केला : ना. विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : गरीबाचे कैवारी म्हणून मुखवटा घेवून फिरणाऱ्यांनी पारनेरचा नेमका कोणता विकास केला. हे जनतेला एकदातरी सांगावे. धाक, दडपशाही आणि गुंडगीरी एवढ्यापूरतेच ज्यांचे राजकारण आहे, अशांना पाठीशी घालणारे जाणते राजेही जिल्ह्याच्या कधी उपयोगी पडले नाहीत अशी खरमरीत टिका राज्याचे महसूल तथा पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.



महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या निवडणुक प्रचारार्थ मंत्री विखे पाटील यांनी राहुरी तालुक्यातील धानोरे, सोनगाव, सात्रळ, माळेवाडी याठिकाणी मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. गावामध्ये पदयात्रेच्या माध्यमातून त्यांनी मतदारांशी संवाद साधला. देशामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सत्ता येणार असल्याने जिल्ह्याच्या विकासासाठी महायुतीचे उमेदवार निवडून देणे आवश्यक असल्याची भुमिका त्यांनी मतदारांना पटवून दिली.

देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारखे सक्षम नेतृत्व मिळाले आहे. देशाच्या प्रगतीचे व्हीजन त्यांच्याकडे आहे. विकसीत भारत घडविण्यासाठी पुन्हा एकदा केंद्रामध्ये भारतीय जनता पक्ष आणि मित्र पक्षाची सत्ता येणार असल्याने राज्यातही महायुतीलाच पाठबळ मिळणार असल्याचा दावा मंत्री विखे पाटील यांनी आपल्या भाषणात केला.

मागील पाच वर्षात खासदार सुजय विखे पाटील यांनी चेहरामोहरा बदलण्याचा यशस्वी प्रयत्न केला. पायाभूत सुविधांची उपलब्धता केली. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून केलेला विकास या जोरावरच डॉ. विखे यांना जनतेचा भरगोस प्रतिसाद मिळत आहे. समोरच्या उमेदवाराकडे सांगायलाही काही नाही. केवळ गुंडगीरी, धाक दडपशाही एवढेच भांडवल त्यांच्याकडे आहे. त्यांनी पारनेरचा कोणता विकास केला. हे जनतेला एकदातरी सांगा! असे थेट आव्हान त्यांनी दिले.

मंत्री विखे पाटील पुढे म्हणाले की, त्यांचे समर्थन करण्यासाठी येत असेलेले जाणते राजे सुद्धा या जिल्ह्याच्या विकासाला मतद करू शकले नाहीत. माजी महसूल मंत्री जिल्ह्यासाठी एकही प्रकल्प आणू शकले नाही. त्यांचा सर्व वेळ बदल्या करण्यात गेला. या भागातील अनेक नेत्यांनी सहकारी संस्थाचे कसे वाटोळे केले जनता जाणून आहे. यामुळे या स्वयंघोषित पुढाऱ्यांना जनता थारा देणार नाही असा विश्वास व्यक्त केला. रयत शिक्षण संस्थेची घटना बदलून कोणी कसा वापर केला? या संस्थेत कसा भ्रष्टाचार झाला? या विषयी आता बोलावेच लागेल असा इशारा त्यांनी शेवटी दिला.

## द•ख•ल

## हरवलेला मोबाईल संबंधितास केला परत



**श्रीरामपूर** : महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या दिवशी मुळा कारखाना प्रशासन अधिकारी बी.एस.बानकर यांची पुतणी गायत्री च्या लग्नाच्या दिवशी मोबाईल हरवला होता रू. ४०,००० किमतीचा तो मोबाईल मुळा कारखाना सुरक्षा कर्मचारी .डी.डी कावले व गोडावून ऑफिस चे कर्मचारी कृष्णा पिटेकर या दोन्ही कर्मचाऱ्यांना सापडला त्यांनी तो मोबाईल लग्नाच्या दिवशी गेटवर आणून दिला असता खरोखरच कामगार दिनाच्या दिवशी प्रामाणिकपणा दाखवला म्हणून कारखान्याचे कार्यकारी संचालक बेल्हेकर यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी जनरल मॅनेजर शंकरराव दरदले, भोर, बानकर, अशोकराव पवार, डी एम निमसे, योगेश घावटे पुगळे आदी उपस्थित होते.

## समर्थ भागवतचे विविध स्पर्धा परिक्षेत दैदिप्यमान यश



**शिरसगाव** : रयत शिक्षण संस्थेचे प्राथमिक विद्यामंदिर श्रीरामपूर या शाळेतील इयत्ता दुसरीचा विद्यार्थी समर्थ संदेश भागवत हा राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परिक्षा जिल्हा गुणवत्ता यादित २ रा आला. तर महात्मा फुले प्रज्ञाशोध मध्ये तालुक्यात पहिला व आय .एम . विनर या स्पर्धा परीक्षेत राज्यात ३ रा आला. एव्हड्यावरच न थांबता समर्थने एक्सलंट ऑलिंपियाड या स्पर्धा परीक्षेत देखील केंद्रात ३ रा नंबर मिळविला आहे. तर एन . एस . ई .या राज्यस्तरिय परिक्षेत गुणवत्ता यादीत राज्यात ९ वा आला आहे. या सर्व स्पर्धा परीक्षांसाठी त्याला पालक व वर्गशिक्षिका अनिता चेडे यांचे मार्गदर्शन लाभले या यशाबद्दल मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने , मुख्याध्यापिका पैठणे व सर्व शिक्षक बंधू - भगिनी, पालकवर्ग यां सर्वांतर्फे समर्थचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## वेदांत लबडेचे विविध स्पर्धा परिक्षेत दैदिप्यमान यश




**शिरसगाव** : रयतचे प्राथमिक विद्यामंदिर, श्रीरामपूर या शाळेतील इयत्ता दुसरी ब चा वेदात गोकुळ लबडे हा राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परिक्षा जिल्हा गुणवत्ता यादित ३ रा, महात्मा फुले प्रज्ञाशोध मध्ये जिल्ह्यात ५ वा, आय. एम. विनर या स्पर्धा परीक्षेत राज्यात २ रा तर एक्सलंट ऑलिंपियाड या स्पर्धा परीक्षेत केंद्रात ४ था या सर्व स्पर्धा परीक्षांसाठी वेदांतचे पालक व वर्गशिक्षिका अनिता चेडे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, मुख्याध्यापिका पैठणे व सर्व शिक्षक , पालकवर्ग यां सर्वांतर्फे समर्थचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## विराट पाटिलचे विविध स्पर्धा परिक्षेत दैदिप्यमान यश



**शिरसगाव** : रयत प्राथमिक विद्यामंदिर, श्रीरामपूर या शाळेतील इयत्ता दुसरी ब चा विद्यार्थी विराट तानाजी पाटिल हा राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परिक्षा जिल्हा गुणवत्ता यादीत २ रा व जिल्ह्यात ७ वा, महात्मा फुले प्रज्ञाशोध मध्ये जिल्ह्यात १ ला, आय. एम. विनर या स्पर्धा परीक्षेत राज्यात ४ था आला आहे या सर्व स्पर्धा परीक्षांसाठी विराटचे पालक व वर्गशिक्षिका अनिता चेडे यांचे मार्गदर्शन लाभले.

## ओंकार झावरेचे विविध स्पर्धा परिक्षेत दैदिप्यमान यश



**शिरसगाव** : रयत प्राथमिक विद्यामंदिर, श्रीरामपूर या शाळेतील इयत्ता दुसरी ब चा विद्यार्थी ओंकार संतोष झावरे हा राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परिक्षा जिल्हा गुणवत्ता यादित ६ वा व जि . १ ला , महात्मा फुले प्रज्ञाशोध मध्ये जिल्ह्यात ५ वा , आय .एम . विनर या स्पर्धा परीक्षेत राज्यात प्रथम आला या सर्व स्पर्धा परीक्षांसाठी ओंकारचे पालक व वर्गशिक्षिका अनिता चेडे यांचे मार्गदर्शन लाभले या यशाबद्दल मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, मुख्याध्यापिका पैठणे व सर्व शिक्षक बंधू - भगिनी, पालकवर्ग यासर्वांतर्फे ओंकारचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## सोनई समर स्माईल्स कॅम्पला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : मुळा एज्युकेशन सोसायटीचे यश अकॅडमी सोनई सी .बी .एस .ई स्कूलमध्ये संस्थेचे उपाध्यक्ष उदयन गडाख यांच्या संकल्पनेतुन समर स्माईल्स २०२४ या समर कॅम्पला उत्साहात सुरुवात झाली. समर कॅम्पसाठी तालुक्यातील पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला . १८० विद्यार्थ्यांनी या समर कॅम्पमध्ये सहभाग घेतला . डॉ निवेदिता उदयन गडाख व नेहल प्रशांत गडाख यांच्या प्रमुख उपस्थितीत समर कॅम्पचे उद्घाटन संपन्न झाले . पारंपरिक विद्यार्थ्यांचे स्वागत औक्षण करून व गुलाब पुष्प देऊन करण्यात आले . विद्यार्थ्यांनी पोहणे , क्रिकेट , घोडेस्वारी , नेमबाजी , नृत्य ' खेळ , विविध कला या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला .विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण आगळा वेगळा आनंद लाभला . या सहभागी विद्यार्थ्यांसाठी चविष्ट व पोषक अल्पोपहार व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे . त्याचबरोबर अबॅकस , वैदिक गणित अशा मुलांच्या बौद्धिक कौशल्याचा विकास करणाऱ्या उपक्रमांबरोबरच विद्यार्थ्यांच्या विविध कलांना वाव देणारा शेकोटीसारखा उपक्रम राबविण्यात आला. हा समर कॅम्प ६ ते ९ व १० ते १५ अशा दोन वयोगटांसाठी आयोजित केलेला आहे. तसेच निवासी व अनिवासी अशा दोन्ही सुविधा उपलब्ध करून दिले आहेत . सोनई परिसरात इतक्या भव्य प्रमाणात समर कॅम्पचे प्रथमच करण्यात आले आहे. त्यामुळे पालकांमध्ये प्रचंड उत्सुकता असून परिसरामध्ये कौतुकाचा व चर्चेचा विषय झाला आहे. समोर कॅम्प ४ मे ते ११ मे २०१४ पर्यंत सुरू राहील अशी माहिती प्राचार्य अझर गोलंदाज यांनी दिली.

## प्रा.जाधव यांची सामाजिक शास्त्र समन्वयकपदी निवड



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : येथील राहुरी एज्युकेशन सोसायटीचे कनिष्ठ महाविद्यालय राहुरी, जिल्हा-अहमदनगर येथील इतिहास विषयाचे तज्ञ प्राध्यापक मनोज जाधव यांची महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे अंतर्गत इयत्ता बारावीच्या सामाजिक शास्त्र या विषयाच्या प्रमुख समन्वयकपदी निवड झाली आहे. त्यांची निवड महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे अंतर्गत सामाजिक शास्त्र विभागप्रमुख सचिन चव्हाण यांनी निवड झाल्याची घोषणा केली. ही निवड इयत्ता बारावीच्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून करण्यात आली आहे. त्यांच्यासाठी सामाजिक शास्त्रे विषयातील विषयनिहाय आवश्यक साहित्य निर्मिती करणे, बहुविध प्रश्नपेढी व प्रश्नपत्रिका निर्माण करून पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टिकोनातून करण्यात आली आहे. या निवडीबद्दल राहुरी एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा प्रभावतीताई सतीश बिहाणी,सचिव- मनोज बिहाणी, सहसचिव- अनुप बिहाणी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास अनाप यांनी देखील त्यांचे अभिनंदन केले आहे.

## 'अमृतवाहिनी' च्या ४२ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी कंपनीत निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : औद्योगिक क्षेत्रातील गरजेनुसार विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण देणाऱ्या अमृतवाहिनी आयटीआय मधील ४२ विद्यार्थ्यांची पुणे येथील शारदा मोटर्स व टीव्हीएस लुकास या कंपनीमध्ये चांगल्या पदावर नोकरी करता निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य विलास भाटे यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना भाटे म्हणाले की, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी शिक्षण संस्था ही गुणवत्तेमुळे देशात अग्रगण्य आहे. अमृतवाहिनी आयटीआय मधून फिटर, इलेक्ट्रिशियन, वायरमन, मोटर मेकॅनिकल, डिझेल मेकॅनिक या ट्रेड मधून कंपनीमध्ये आवश्यक असणारे उच्च दर्जाचे ट्रेनिंग दिले जात आहे. याचबरोबर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम राबवले आहेत.संस्थेतील ट्रेनिंग प्लेसमेंट विभागाच्या वतीने कॅम्पस इंटरव्यू चे आयोजन केले असून यामधून शारदा मोटर्स व टीव्हीएस कंपनी पुणे यांनी विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेऊन ४२ विद्यार्थ्यांची चांगल्या पदावर नोकरी करता निवड केली आहे. या कंपन्यांच्या कॅम्पस इंटरव्यू साठी टीव्हीएस कंपनीकडून प्रोडक्शन मॅनेजर विद्या दिनगणे , मॅनेजर रीना हिवाळे व गजानन पाटील हे उपस्थित होते. तर शारदा मोटर्स कडून महादेव पाटील व देव आंबेकर हे उपस्थित होते. या इंटरव्यूच्या आयोजनाकरता संजय कुटे,संदीप दिघे व सचिन मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.निवड झालेल्या या विद्यार्थ्यांचे माजी शिक्षण मंत्री आमदार बाळासाहेब थोरात,मा.आ.डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, अकॅडमी डायरेक्टर डॉ.जे.बी.गुरव, प्राचार्य व्ही.व्ही.भाटे यांनी अभिनंदन केले आहे.

## साईश ढोकणेचे विविध स्पर्धा परिक्षेत यश



**शिरसगाव** : रयत प्राथमिक विद्यामंदिर, श्रीरामपूर या शाळेतील इयत्ता दुसरी अ चा विद्यार्थी साईश रामेश्वर ढोकणे हा राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परिक्षा जिल्हा गुणवत्ता यादित ३ रा व जि . ८ वा , महात्मा फुले प्रज्ञाशोध मध्ये जिल्ह्यात ३ रा, आय. एम. विनर या स्पर्धा परीक्षेत राज्यात २ रा आला आहे. एक्सलंट ऑलिम्पियाड या परिक्षेत केंद्रात ४ था या सर्व स्पर्धा परीक्षांसाठी साईशचे पालक व वर्गशिक्षिका मेघा पवार यांचे मार्गदर्शन लाभले या यशाबद्दल मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, मुख्याध्यापिका पैठणे व सर्व शिक्षक बंधू - भगिनी, पालकवर्ग यासर्वांतर्फे साईशचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## वारकरी बालसंस्कार शिबिराला भास्करगिरी महाराजांची भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील तीर्थक्षेत्र बहिरवाडी येथे युवा कीर्तनकार हभप लक्ष्मण महाराज नांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या वारकरी बालसंस्कार शिबिराला देवगड येथील गुरुदेव दत्त पिठाचे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी भेट दिली.बालसंस्कार शिबिरातून चांगल्या विचारांची प्राप्ती होत असल्याने हे सुविचार शेवटच्या श्वासापर्यंत टिकवून ठेवण्यासाठी बालसंस्कार शिबिरे ही गरजेची असल्याचे प्रतिपादन गुरुवर्य भास्करगिरी बाबांनी यावेळी बोलताना केले.



बहिरवाडी येथे गुरुवर्य भास्करगिरीजी बाबांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी श्री कालभैरवनाथांच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले येथील मंदिराच्या अग्रभागी सुरू असलेल्या गोपूराची त्यांनी पहाणी केली.यावेळी त्यांनी श्री कालभैरवनाथ संस्थानच्या सभामंडपात सुरू असलेल्या बालसंस्कार शिबिराला भेट दिली.यावेळी शिबीर संयोजक हभप लक्ष्मण महाराज नांगरे यांच्या हस्ते गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांचे संतपूजन करण्यात आले.यावेळी सुमारे दिडशे बालवारकऱ्यांशी सुसंवाद साधतांना गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज म्हणाले की, वारकरी बालसंस्कार शिबिरातून भावी पिढीतील ही बालके धर्माचे रक्षक होणार आहे,या शिबिराच्या माध्यमातून सात्विकता व सुविचार वाढीस लागणार आहे,मातापिता व गुरुजन वर्ग मुलांना संस्कार देतात याच संस्काराने या पिढीचे जीवन फुलासारखे होणार आहे, चांगले काम करतांना विरोध हा होणारच मात्र त्याकडे दुर्लक्ष करून इतरांचे वाईट न करता आपले काम करत रहा यातूनच संस्कार व संस्कृतीचे जतन करणारी पिढी घडेल असा संदेश देऊन त्यांनी वारकरी बाल संस्कार शिबिराला शुभेच्छा दिल्या.यावेळी देवगडचे सेवेकरी हभप बाळू महाराज कानडे,रामनाथ महाराज पवार,विजय महाराज पवार,शांतीलाल वरखडे,दादा महाराज साबळे,श्री कालभैरवनाथ देवस्थानचे अध्यक्ष अशोकभाऊ कोलते, विश्वस्त दिनकरराव हारदे, बी.जी.मिटकरे,सचिव दिलीपराव नळघे,सरपंच इंजिनिअर आनंद नांगरे, संतसेवक सुखदेव नांगरे, दामोदर नांगरे, डॉ. संतोष शेळके,नंदकुमार वाखुरे,संतसेवक सोमनाथ वाखुरे, भाऊसाहेब येवले, बहिरुतात्या कोरेकर,अंबादास लष्करे,अशोक नांगरे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.१९ दिवशीय वारकरी बालसंस्कार शिबिरासाठी शिबीर संयोजक लक्ष्मण महाराज नांगरे,रामनाथ महाराज पवार,अंकुश महाराज जगताप,दादा महाराज साबळे, विजय महाराज पवार, सुगम महाराज शिंदे,गणेश महाराज तनपूरे, भास्कर महाराज मुळक,सचिन महाराज पवार, शशिकांत महाराज कोरेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळत असून गायन, मृदुंग वादन यासह वारकरी संप्रदायातील सुसंस्कारमय शिक्षण सदर शिबिरात दिले जात आहे.

## मोतीबिंदू व कर्ण शिबिरात १५ शस्त्रक्रिया

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी येथे संत गाडगे महाराज आश्रमामध्ये झालेल्या राम रामेश्वर फाउंडेशन, दिव्यांग शक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिबिराचे उद्घाटन प्रफुल्ल भैया शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी अजीज भाई शेख हे होते. पाहुण्यांचे स्वागत व परिचय डॉ. चंद्रकांत गिरगुणे यांनी करून दिली. या मोतीबिंदू व कर्ण शिबिरात डॉ. चंद्रकांत गिरगुणे, मधुकर घाडगे, संजय इघे यांची भाषणे झाली. या शिबिरात आनंद ऋषीजींचे डॉ. सचिन शेलार यांनी ३२ पेशंट तपासून १५ पेशंटला



शस्त्रक्रियांसाठी पाठविले तर डॉ. अभिजीत यांनी ४० पेशंट कर्ण रोगांचे तपासून १० पेशंट्सला श्रवण यंत्र देण्यात येणार आहे. डॉ. महेश इघे यांनी दंत रोगाचे ३० पेशंट तपासून त्यावर औषधोपचार केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय इघे यांनी केले तर उपस्थितांचे आभार रवींद्र भुजाडी यांनी मानले. या कार्यक्रमात गणेश शिंदे, गणेश देवरे, सोपानराव शिरसाठ, श्रीकांत गावडे आदी मान्यवर उपस्थित होते. आतापर्यंत ८३ शिबिर पूर्ण झाले असून ४७६१ इतक्या शस्त्रक्रिया पूर्ण झालेल्या आहेत.

## अंतःकरणात तळमळ असली की भगवंताचे दर्शन घडते : रामगिरी महाराज



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : श्रीरामपुर तालुक्यातील उंदिरगांव येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व कीर्तन महोत्सव सांगता कार्यक्रमात महंत रामगिरी महाराज यांनी अंत: करणात तळमळ असली की भगवंताचे दर्शन घडते असे प्रतिपादन केले. गेल्या ३० एप्रिल पासून ते ७ मे पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा कार्यक्रमाला महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांनी किर्तन सेवा दिली. शेवटच्या दिवशी सायंकाळी ६ वा . महंत रामगिरी महाराज यांची रथातुन सवाद्य अशी मिरवणूक काढण्यात आली. सप्ताह काळात ज्या भाविकांनी सकाळी चहा, नाष्टा, सायंकाळ चे अन्नदान, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. त्यांना महाराजांच्या हस्ते श्रीफळ देऊन सन्मानीत केले. तसेच संत पुजन केलेल्या भाविकांना महाराजांच्या हस्ते ब्रम्हलीन सद्गुरु नारायणगिरी महाराज यांची प्रतिमा, श्रीफळ देऊन सन्मानीत करण्यात आले .समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळ तसेच गावातील तरुण युवकांचे महाराजांनी कौतुक केले. शेवटी महाराजांनी दहिहंडी फोडुन काल्याच्या किर्तनाने सांगता केली . उंदिरगांव व पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थीत होते,

# महाविकास आघाडीची संगमनेरात भव्य मशाल रॅली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : महाविकास आघाडीचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या प्रचारार्थ काँग्रेस पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना ठाकरे गट, युवासेना, काँग्रेस कमिटी,युवक काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि मित्रपक्षाच्या वतीने संगमनेर शहरात भव्य मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला संगमनेर शहरातील युवक व नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.



संगमनेर नगरपालिकेपासून सुरू झालेल्या या रॅलीमध्ये युवक काँग्रेसचे अध्यक्ष कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात, शिवसेनेचे संपर्कप्रमुख सूर्यकांत शिंदे, नितेश साटम, अमर कतारी, अमित चव्हाण, किरण घोटेकर, सौरभ देशमुख, रोहित वाकचौरे ,निखिल पापडेजा, शैलेश कलंत्री, गौरव डोंगरे, सोमेश्वर दिवटे, सय्यद हैदर, अमित चव्हाण,फैसल सय्यद, पप्पू कानकाटे ,वैभव अभंग, अक्षय गुंजाळ ,गोविंद नागरे, शेखर जोशी, अक्षय गाडे आदींसह विविध पदाधिकारी सहभागी होते.यावेळी बोलताना सूर्यकांत शिंदे म्हणाले की, शिवसेनेत झालेल्या दूफळीनंतर ठाकरे गटासमोर नवीन पक्षचिन्ह सामान्य मतदारांच्या पर्यंत पोहचवणे आव्हानात्मक होते मात्र ठाकरेंच्या निष्ठावंत शिवसैनिकांनी आणि महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी नवे पक्षचिन्ह घराघरात पोहचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली असल्याने वाकचौरे ही मोठ्या मताधिक्याने निवडून येणार आहेत.तर डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, भाजपा सरकारने युवकांचा मोठा भ्रमनिरास केला आहे. दोन कोटी नोकऱ्या देण्याऐवजी अनेकांना बेरोजगारी दिली.महाराष्ट्रात झालेली पक्ष फोडाफोडी जनतेला मान्य नसून त्यामुळे मोठी चीड निर्माण झाली आहे.याचबरोबर संपूर्ण देशातही भाजपा विरोधी मोठी लाट निर्माण झाले असल्याने चार जूनला देशामध्ये एनडीएचे सरकार मोठ्या मताधिक्याने निवडून आलेले असेल असा ठाम विश्वास व्यक्त करताना तरुणांनी या निवडणुकीमध्ये देशाची लोकशाही वाचवण्यासाठी एकत्र येऊन काम करावे असे आवाहन केले.

महाराष्ट्रप्रेमी नागरिक महाविकास आघाडीला विजयी करण्यार असल्याचे प्रतिपादन युवासेना महाराष्ट्र राज्याचे कोअर कमिटी सदस्य अंकित प्रभू यांनी केले तर अमर कतारी म्हणाले, महाविकास आघाडीचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांना निवडून देण्यासाठी आणि आदरणीय कुटुंबप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे, देशाचे नेते आदरणीय शरद पवार साहेब व महाविकास आघाडीचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे हात बळकट करण्यासाठी संगमनेर मधील नागरिकांनी काम करावे असे आवाहन केले.

या रॅलीत युवासेना, युवक काँग्रेस, एनएसयूआय,राष्ट्रवादी युवक चे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते यावेळी हाती मशाल घेऊन युवकांनी घोषणांनी संगमनेर शहर दणाणून दिले.

## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी श्री/श्रीमती. सचिन रामचंद्र गायकवाड रा हरेगाव ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर यांचे साडीले दिनांक २५/०४/२०२४ रोजीचा अर्ज प्राप्त झालेला आहे सदर अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये नमूद कर आहे की अर्जदार यांचे आजोबा नामे संभाजी चिमाजी गायकवाड हे दिनांक १४/०५/१९६९ रोजी राहते घरी हरेगाव ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर येथे मयत झालेला आहे. सदर अर्जदारचे आजोबा यांची मृत्युची नौद त्यांना जन्म-मृत्यु कार्यालयात मिळुन आलेली नाही. त्यामुळे त्यांनी त्यांचे आजोबा यांची मृत्युची नौद सरकारी दप्तरी लावायची आहे. यासाठी त्यांनी दिनांक २५/०४/२०२४ रोजी अर्ज दिला आहे.उपरोक्त या जाहीर प्रगटना व्दारे तमाम जनतेला सुचित करण्यात येते की, वरील मृत्युचे दाखल्याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित मृत्युचा दाखला निर्गमित करण्यात येईल

**तहसिलदार श्रीरामपूर**

(पान १ वरून) (पान १ वरून)

## सदावर्ते पती-पत्नीची एसटी बँकेच्या संचालक पदावरून हकालपट्टी

दोघांविरोधात तक्रार दाखल केली होती. गुणरत्न सदावर्ते यांचे मेहुणे सौरभ पाटील यांची स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती केल्यापासून बँकेचा व्यवहार तोट्यात आला आहे. सदावर्ते आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मनमानी निर्णयांमध्ये सभासदांनी १८० कोटी रुपयांच्या ठेवी काढून घेतल्या. त्यामुळे सदावर्ते व त्यांच्या पत्नीला बँकेच्या तांत्रिक मंडळावरून काढून टाकण्यात यावे, अशी मागणी शिवसेनेचे विधान परिषदेचे सदस्य अनिल परब यांनी केली होती.

सदावर्ते दाम्पत्याच्या हातात एसटी बँकेचा कारभार गेल्यापासूनच नाराजी व्यक्त केली जात होती. सदावर्ते चुकीचा कारभार करत असल्याचा आरोप संदीप शिंदे यांनी केला होता. त्यानंतर सदावर्ते नी नियम मोडल्याचे निरीक्षण नोंदवत सहकार विभागाने दोघांवर ही कारवाई केली.

'तब्बल चार हजार कोटींची वार्षिक उलाढाल असलेल्या स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँक अर्थात एसटी बँकेतून ४७९ कोटींच्या ठेवी ठेवीदारांनी काढल्या आहेत. कर्ज आणि ठेवी यांचा ताळमेळ बसत नसल्याने कर्जवाटपावर मर्यादा आल्या आहेत. यामुळे एसटी कर्मचाऱ्यांचे खाते असलेली बँक वाचवण्यासाठी प्रशासकाची नेमणूक करावी', अशी मागणी एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली होती.राज्यातील ५० हून अधिक शाखांमध्ये ६२ हजार एसटी कर्मचारी बँकेचे खातेदार आहेत. बँकेत नवे संचालक मंडळ अस्तित्वात आल्यानंतर व्यवस्थापनात हुकूमशाही सुरू आहे. नियम डावलून बँकेत ३७ जणांची भर्ती करण्यात आली. ठेवी काढल्याने सीडी रेशो ९५.३५ टक्क्यांवर गेला आहे. राज्य सरकारच्या सहकार खात्याचे बँकेकडील दुर्लक्ष याला जबाबदार आहे. सभासदांनी मागणी केल्यानंतर बैठक ही लावण्यात येत नाही. संचालकांच्या मताशिवाय कर्जवाटप होत असल्याने भ्रष्टाचाराचे आरोप बरगे यांनी केले होते.

## लोकसभेपाठोपाठ विधान परिषदेची रणधुमाळी

पक्षाच्या आमदारांना मत दाखवून टाकावे लागते. पण विधान परिषद आमदार गुप्त मतदान करतात त्यामुळेच विधान परिषद निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर क्रॉस वोटिंग होण्याची शक्यता असते. निवडणुकीसाठी जितके मतदार उभे असतील तेवढ्या उमेदवार ना पसंती क्रम देता येतो. विधान परिषद सदस्यांचा कार्यकाळ सहा वर्षांचा असतो. विधान परिषद स्थायी सभागृह आहे. ते कधीही विसर्जित होत नाही. दर दोन वर्षांनी सभागृहाचे एकास तीन सदस्य निवृत्त होतात तेवढेच नव्याने निवडतात.

## पाकधार्जिणी काँग्रेस पुन्हा नको

म्हणाले होते, काँग्रेसला लांब ठेवा, काँग्रेसपासून लांब रहा. माझी काँग्रेस होऊ देणार नाही आणि माझी काँग्रेस होईल, तेव्हा माझे शिवसेना दुकान बंद करेल. त्या बाळासाहेबांचे विचार तुम्ही सोडले, खुर्चीसाठी सगळे सोडले. आणि आज तुम्हाला काँग्रेसची भाषा, पाकिस्तानची भाषा बोलणाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसावे लागते आहे. काँग्रेस का हात पाकिस्तान के साथ, अशा लोकांना तुम्ही मतदान करणार? हिंदुस्थानमध्ये राहून पाकिस्तानची भाषा बोलणाऱ्यांना इकडे थारा नाही.

आमचे सरकार फेसबुक सरकार नसून फेस टू फेस सरकार आहे. प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा आम्ही प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत जाऊन काम केले. केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या योजना राबवताना जातीपातीचा धर्माचा विचार केला नाही. मुस्लिम धर्मियांच्या मनात सरकारविरुद्ध विष पेरण्याचे काम इंडिया आघाडीचे लोक करत आहेत. भारतीयांमध्ये भांडणे लावणाऱ्यांना सत्तेपासून दूर ठेवा. देशाची प्रगती तसेच आंतरराष्ट्रीय कीर्ती वाढविणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केले.

## बहीण-भाऊ एक झालात, अगोदर लोकांचे पैसे द्या

एक झालात. निवडणुकीत करोडो पैसे खर्च करता, लोकांचे पैसे द्या, असे म्हणत खळबळजनक आरोप शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी भाजप उमेदवार पंकजा मुंडे यांच्यावर केले आहेत. शिवाय, मंत्री धनंजय मुंडे यांच्यावरही सोनवणे यांनी टीका केली आहे. बीडमधील प्रचारसभेत ते बोलत होते.

पुढे बोलताना सोनवणे म्हणाले, वाहतूक ठेकेदार असो, ऊसवाले असो, कर्मचारी असो सर्वजण भेटतात. एक कर्मचारी म्हणाला आमचे १६ लाख ताईसाहेबांच्या कारखान्याने बुडवले. काहीजण म्हणतात हा पैसा बाहेरगावा गेला. विकासावर बोला, १५ वर्षात काय केलं सांगा? १० वर्षात तुमचे सरकार होते. बीडचे मागासलेपण का गेले नाही? साधा घाटनांदूरला लोक थांबा मागतात तेवढं तरी देता येतय का बघा. मागच्या वेळी सर्व गोष्टी अलबेलं होतं. आता काय झालयं? यांच्या बोलण्याला कोणीही बळी पडणार नाही. माय-बाप जनता माझ्या पाठिशी आहे. गोरगरिब मजुरांचा आमचा मुलगा बजरंग सोनवणे याला आम्हाला मतदान द्यायचे आहे, असं जनतेने ठरवलं आहे. पालकमंत्री महोदय हा तुमचा नाही तर बीड जिल्ह्याचा अपमान आहे. मोदींनी सभेत तुमचे नाव घेतलं नाही. मोदी म्हणाले मुस्लिमांना आरक्षण देणार नाही.

## जनतेच्या हितासाठी माझा आत्मा ५६ वर्षे राज्यात फिरतोय : शरद पवार

प्रांगणात सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत खासदार शरद पवार म्हणाले, निलेश लंके यांच्या साठी उस्फुर्तपणे मोठ्या संख्येने जनसमुदाय भर उन्हात उपस्थित आहे. मोदी सरकारला आपल्या विजयाची खात्री नसल्यामुळे आपल्याला प्रचारासाठी जास्त वेळ मिळावा, यासाठी महाराष्ट्राची निवडणूक पाच टप्प्यात घेतली आहे. तसेच निवडणूक वेळापत्रक बदललं. सध्या भारतात लोकशाही संकटात आहे. संसदीय लोकशाहीची चिंता संपूर्ण देशात निर्माण झाली आहे. अशी परिस्थिती निर्माण झाली असताना महानगरपालिका नगर परिषद, जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणूक का झाल्या नाहीत एव्हढेच काय तर पुढें एक काळ विधान सभेच्या निवडणुका टाळल्या जातील हे लवकरच ऐकायला मिळेल मात्र या निवडणकीत लोकशाही टिकवण्याची जबाबदारी आपण घ्यायची आहे अनेक प्रधानमंत्री कालखंडात मी कामं केलय. यासोबत सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, शेतकरी प्रश्न आणि सर्वसामान्य लोकांच्या अडचणी संदर्भात मी प्रत्यक्ष चर्चा करून अडचणी सोडवल्या आहेत संविधान आणि लोकशाही वाचविण्यासाठी निलेश लंके यांना बहुसंख्य मतांनी विजयी करण्याचे आवाहन शरद पवार यांनी केले.


### प्लॉट विकणे आहे

शेवगाव शहरात वरूर रोड स्वामी समर्थ मंदिरा शेजारी
N - प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
संपर्क ७९७२१६५५८८



### पाहिजेत

ट्रस्ट वेल इंजिनीअर्स इंडिया प्रा.लिमिटेड कंपनीसाठी त्वरित शिकाऊ (१) वेल्डर (२) टर्नर (३) फिटर पाहिजेत. पत्ता प्लॉट न. A - १८१ एमआयडीसी श्रीरामपूर ४१३७०९.
मोबा: ९१३००३१३७५
मेल आयडी: hr@trustwellindia.com


# रेडक्रॉस सोसायटीकडून बसस्थानक स्वच्छता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** जागतिक रेड क्रॉस दिनानिमित्त येथील इंडियन रेड क्रॉस सोसायटी श्रीरामपूर चे वतीने बसस्थानक स्वच्छता अभियान राबविण्यात आले. बसस्थानकाच्या चारही बाजूचा परिसर स्वच्छ करण्यासाठी सर्व आजिव सभासद सकाळी सहा वाजता स्थानकावर येवून दोन तास स्वच्छता केली. या स्तुत्य उपक्रमाचे प्रवाशांकडून कौतुक करण्यात आले त्यानिमित्त रेड क्रोसला धन्यवाद दिले. अध्यक्ष तथा प्रांताधिकारी किरण सावंत पाटील साहेब,उपाध्यक्ष तथा तहसीलदार यांचे मार्गदर्शनानुसार अभियान यशस्वी पार पडले. स्वच्छता अभियानासाठी सचिव सुनील साळवे,प्रवीण साळवे,श्रावण भोसले,राजेंद्र केदारी,विश्वास भोसले,साहेबराव रकते,सुरेश वाघुले,केशव धायगुडे,नानासाहेब मुठे,सोपान नन्नवरे,कांतिलाल शिंदे,डॉ.स्वप्नील पुरणाले,किरण सोनावणे,सचिन चंदन,ज्ञानदेव




माळी, सुरजन साळवे बाळासाहेब पाटोळे, समद शेख, दिलावर पठाण,भाऊसाहेब शिंदे,शोभा कवडे,पुष्पा शेंडगे,निर्मला लांडगे,सविता साळुंके,स्वाती पुरे ,परी चंदन,आदी आजीव सभासद उपस्थित होते सर्वांनी विशेष परिश्रम घेतले.

## चाकणच्या कंपनीमुळे कोट्यवधींचा भ्रष्टाचार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुण्याच्या चाकण एमआयडीसीमध्ये पहिल्या कंपनीनं दुसऱ्या कंपनीच्या नावावर ४५ एकर जमिनीचा करार करून कोट्यवधींचा भ्रष्टाचार केल्याचे प्रकरण उजेडात आले आहे. हजारो स्थानिकांचा रोजगारदेखील या कंपनीने हिरावून घेतला.

सविस्तर माहिती अशी की, २०१५ ला लेसो नावाच्या चायनीज कंपनीला चाकण एमआयडीसीने ४५ एकर जागा दिली. तिथे २०१६ मध्ये त्यांचा करार झाला आणि फॉरेन फंडिंग ही झाले, की- विदेशी निधीचंही काम झाले याद्वारे ती चायनीज कंपनी चाकण परिसरातील हजारो नागरिकांना रोजगार देणार होती. परंतु, करारानंतर चार वर्षांच्या आत मॅन्युफॅक्चरिंग कंपनी सुरू व्हायला हवी, असा नियम असतानाही ती सुरू झालेली नाही. तो ४५ एकरांचा प्लॉट आहे तसाच ठेवला. उलट चायनाच्या लेसो या कंपनीने चुकीचे सर्क्युलर वापरून, ती जागा इतर लमोन्ड कंपनीच्या नावाने वळवली. त्यात कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप आरटीआय कार्यकर्त्यांनी केला आहे. याबाबत आता तेथील स्थानिकांनीही विरोध केला असून, आंदोलनाचा इशारा दिला आहे. मुळात चायनीज कंपनी 'लेसो' तिथे आल्यास हजारो लोकांच्या हाताला काम मिळणार होतं; परंतु आता ते मिळणार नाही. कारण- तिथे लॉजिस्टिक कंपनी येणार आहे. म्हणून स्थानिकांनी संबंधित यंत्रणांना इशारा दिला असून, मूळ कंपनीला ४५ एकर जागा परत न दिल्यास मोठे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे चाकण एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी काय निर्णय घेतात हे बघावे लागेल. यासंबंधी लोकसत्ता ऑनलाइनने चाकण एमआयडीसीचे अधिकारी शिवाजी राठोड यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी याबाबत उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यात माझा काही संबंध नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. नेमके या प्रकरणी आता काय होते ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## नितीश रेड्डीच्या शानदार झेलने प्रेक्षक चकीत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** सनरायझर्स हैदराबादचा खेळाडू नितीश कुमार रेड्डी याने आयपीएलच्या या हंगामात खूप प्रभावित केले आहे. एकीकडे त्याने फलंदाजीत चमक दाखवली, तर दुसरीकडे क्षेत्ररक्षणातही तो उत्कृष्ट कामगिरी करताना दिसला आहे. बुधवारी हैदराबाद स्टेडियमवर लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात नितीश रेड्डीने शानदार झेल घेत प्रेक्षकांना चकीत केले.

ही घटना लखनऊ सुपर जायंट्सच्या डावातील तिसऱ्या षटकातच पाहायला मिळाली. भुवनेश्वर कुमारने पहिला चेंडू एलएसजीचा सलामीवीर क्विंटन डी कॉकला टाकला, तेव्हा त्याने त्याच्या आवडत्या पिकअप शॉटने तो डीप बॅकवर्ड स्क्वेअर लेगच्या दिशेने खेळला. यानंतर सीमारेषेवरील क्षेत्ररक्षक नितीश कुमार रेड्डीने उंच उडी मारली आणि दोन्ही हातांनी तो पकडण्याचा प्रयत्न केला.

जेव्हा तो उडी मारल्यानंतर खाली येऊ लागला, तेव्हा त्याचा समतोल बिघडू लागला आणि त्याचा पाय सीमारेषेवर गेला. पण शहाणपणा दाखवत त्याने लगेच चेंडू आत फेकला. त्यानंतर तो स्वतः सीमारेषेच्या आतून बाहेर गेला. त्यानंतर पुन्हा आत येत शानदार झेल पूर्ण केला. नितीश कुमार रेड्डीने या हंगामात आपल्या फलंदाजीने प्रभावित केले आहे. नितीशने ८ सामन्यात २३९ धावा केल्या आहेत. त्याची सरासरी ४७.८० आहे. तर स्ट्राइक रेट १५० च्या वर आहे. यात दोन अर्धशतकांचाही समावेश आहे.

नितीश कुमार रेड्डीनंतर सनवीर सिंगनेही उत्कृष्ट क्षेत्ररक्षण केले. सनवीरने पाचव्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर मार्कस स्टॉइनिससारख्या महत्वाच्या खेळाडूला तंबूत पाठवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. भुवनेश्वर कुमारचा चेंडू मार्कसने लेग साइडकडे मारला. ज्यावर सनवीरने डायव्हिंग करत उत्कृष्ट झेल घेतला. या सामन्यात सनवीरच्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षणामुळे मार्कसला अवघ्या ३ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतावे लागले.

## डी फार्मसी महाविद्यालयाच्या ९ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनई :** येथील मुळा एज्युकेशन सोसायटीच्या मुळा रुरल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, सोनई या महाविद्यालयात सांडोज प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई या औषध निर्माण करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपनीने नवी मुंबई या युनिटसाठी भरती करण्याकरिता मुलाखती घेतल्या असून यात मुळा रुरल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, सोनई येथे झालेल्या प्रत्यक्ष मुलाखतीत एकूण ७२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता . त्यापैकी तीन महाविद्यालयातून एकूण ९ विद्यार्थ्यांची निवड झालेली असून यामध्ये मुळा रुरल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, सोनई महाविद्यालयाचे पाच विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. यामध्ये निवड झालेले विद्यार्थी गवांदे ऋषिकेश, दांगट दर्शन,हापसे अभिषेक,डोईफोडे युवराज, देशमुख तुषार यांची निवड झाल्याचे संस्थेचे उपाध्यक्ष उदयन गडाख यांनी सांगितले.सोनई सारख्या ग्रामीण भागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी मुळा रुरल इन्स्टिट्यूट फार्मसी, सोनई या महाविद्यालयात दरवर्षी नामांकित बहुराष्ट्रीय औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचे प्रत्यक्ष मुलाखती आयोजित केले जात असल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष उदयन गडाख पाटील यांनी दिली. सोनई येथील डी फार्मसी महाविद्यालयास सुसज्ज इमारत, अद्ययावत प्रयोगशाळा, भव्य ग्रंथालय, अनुभवी शिक्षक यासारख्या सुविधा उपलब्ध असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक व संस्थेचे व्यवस्थापन सदैव कटिबद्ध असल्याचे संस्थेचे सहसचिव डॉ. विनायक देशमुख यांनी सांगितले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे मुळा एज्युकेशन संस्थेचे संस्थापक माजी खासदार यशवंतराव गडाख,आमदार शंकरराव गडाख,सचिव उत्तमराव लोंढे, सहसचिव डॉ. विनायक देशमुख यांनी अभिनंदन केले. हा उपक्रम यशस्वी करणे करिता मुळा रुरल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी,सोनई चे प्राचार्य प्रशांत घुले, ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर प्रसाद काळे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

## पुणतांबा परिसरातील रस्ते वेड्या बाभळींच्या विळख्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पुणतांबा :** गावाला जोडणारे अनेक रस्ते अत्यंत अरुंद झाले असून बहुतांशी रसत्यावर वेडया बाभळींनी अतिक्रमणे केल्यामुळे ह्या रस्त्यावरून दळणवळण करतांना वाहन चालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे पुणतांबा - वाकडी, पुणतांबा - रामपूरवाडी पुणतांबा, कोपरगाव - पुणतांबा -शिर्डी तसेच जळगाव - पुणतांबा शिवरस्ता सह अनेक प्रमुख रसत्यावर रसत्याच्या दुतर्फा काही ठिकाणी वेडया बाभळी मोठया प्रमाणात वाढल्या आहे वेड्या बाभळी मुळे रस्ते अरुंद झाले आहेत. बहुतेक रस्ते आगोदरच अतिक्रमणामुळे अरुंद झाले आहेत. काही ठिकाणी तर ६० ते ४५ फूट रुंदीचे असलेले रस्ते अवघे ५ ते ६ फूट रुंदीचे झाले आहेत. सार्वजनिक बांधकाम खाते पंचायत समितीसह संबधित विभागाच्या अधिकारी वर्गाचे रस्त्याच्या प्रश्नाकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पुणतांबा गावाला जोडणाऱ्या सर्वच रस्त्यावर ज्या ज्या ठिकाणी वेडया बाभळी वाढलेल्या आहेत व ज्यांच्या मुळे दळणवळणामध्ये अडथळा येत असेल त्या तातडीने काढाण्यात याव्यात अशी मागणी ग्रामस्थाकडून केली जात आहे.

## तंत्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी मल्टिपल एंट्री-एक्झिटचा पर्याय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने (एमएसबीटीई) वास्तूशास्त्र आणि अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम राबवणाऱ्या संस्थांमध्ये मल्टिपल एंट्री-एक्झिट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रथम वर्ष उत्तीर्ण केलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांसाठी पदविका अभ्यासक्रम सोडण्याचा पर्याय देण्यात आला असून, त्याबाबतच्या नोंदणीसाठी येत्या २० जूनपर्यंत ऑनलाइन दुवा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती एमएसबीटीईचे सचिव डॉ. महेंद्र चितलांगे यांनी दिली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून के स्कीम अंतर्गत प्रथम वर्षाचा सुधारित केलेला पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम राबवण्यास सुरुवात करण्यात आली. सद्य:स्थितीत द्वितीय वर्षाचा अभ्यासक्रम तयार करण्यात येत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये मल्टिपल एंट्री-एक्झिटचा पर्याय इच्छुक विद्यार्थ्यांना देण्याचे निर्देश आहेत. त्यामुळे मंडळाशी संलग्न वास्तुशास्त्र आणि अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम राबवणाऱ्या सर्व पदविका संस्थांतील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रम सोडण्याचा पर्याय लागू राहील. त्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष उत्तीर्ण करणे आणि चार आठवड्यांचे कार्यप्रशिक्षण (इंटर्नशीप) पूर्ण करणे बंधनकारक राहील. तसेच अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सोडणाऱ्या विद्यार्थ्यांना एमएसबीटीईकडून व्यावसायिक प्रमाणपत्र (सर्टिफीकेट ऑफ व्होकेशन) दिले जाईल.

अभ्यासक्रम सोडण्यासाठी विद्यार्थ्यांना नोंदणी करावी लागणार आहे. त्यासाठी एमएसबीटीईच्या संकेतस्थळावर 'लर्निंग असेसमेंट स्किम फॉर वन इयर एक्झिट कोर्स'चा ऑनलाइन दुवा २० जूनपर्यंत उपलब्ध करून देण्यात येईल. या बाबत प्राचार्य, संस्थाप्रमुखांनी सर्व विभागप्रमुख तसेच अधिव्याख्याता यांना माहिती द्यावी. तसेच विद्यार्थ्यांच्या औद्योगिक प्रशिक्षणाबाबत औद्योगिक क्षेत्र ठरवण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्याची असेल, असे स्पष्ट करण्यात आले.

### रुपवते यांच्या प्रचारार्थ सुजात आंबेडकर यांची विजय संकल्प सभा

**नेवासा :** शिर्डी लोकसभा मतदार संघाच्या वंचीत बहुजन आघाडीच्या उमेदवार उत्कर्षा रुपवते यांच्या प्रचारार्थ कोपरगाव येथे गुरुवार दि.९ मे रोजी संध्याकाळी ६ वाजता सुजात आंबेडकर यांची विजय संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले आहे. कोपरगाव येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मैदानात सदरची सभा होत असून सर्वसामान्य गोरगरीब वंचीत घटकांचे प्रतिनिधी म्हणून लोकसभा निवडणुक लढविणाऱ्या उत्कर्षा रुपवते यांच्या प्रचारार्थ होणाऱ्या या सभेला मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेवासा तालुका अध्यक्ष हरिषदादा चक्रनारायण यांनी केले आहे.


### नावात बदल

मी **सौ. सुनीता अशोक साळुंके** (वय ५२, धंदा घरकाम) रा. सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर या ठिकाणची कायमची रहिवासी असून माझे लग्नापूर्वीचे नाव **सुनंदा बबन खैरे** असे होते. लग्नानंतर ते बदलून **सौ सुनीता अशोक साळुंके** असे झालेले आहे. तरी वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहेत.



### नावात बदल

मी **सौ. सुरेखा बाळासाहेब शेटे** (वय ५६, धंदा घरकाम) रा. सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर या ठिकाणची कायमची रहिवासी असून माझे लग्नापूर्वीचे नाव **मंगला तुकाराम लांडे** असे होते. तर लग्नानंतर हे नाव बदलून **सौ सुरेखा बाळासाहेब शेटे** असे झालेले आहे. वरील दोन्ही नावाची व्यक्ती एकच आहे.


# पिक विम्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी अप्पर तहसीलदारांना धरले धारेवर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** ११ तारखेपर्यंत पिकविम्याचे पैसे शेतकऱ्यांचा खात्यांवर आले नाही तर १३ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. दोन दिवसांत विम्याची रक्कम देणार असल्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांनी तहसीलदार यांचे कार्यालय सोडले.

गंगापूर तालुक्यातील जामगाव भेंडाळा मंडळातील शेतकऱ्यांना पिक विमा पासून वंचीत ठेवल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेत ८ में रोजी १२ वाजता गंगापुर तहसिलदार यांच्या कॅबिनचा ताबा घेतला यावेळी तहसील कार्यालयात एकच गोंधळ उडाला.यापूर्वी या भागातील शेतकऱ्यांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला होता. परंतु प्रशासनाकडून कोणतीही दखल न घेतल्यामुळे आज शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयाचा ताबा घेत पिक विमा कर्मचारी हेमंत शिंदे व अपर तहसीलदार आकाश दहादडे, नायब तहसीलदार गौरव कुमार खैरनार व कार्यातील कर्मचाऱ्यांना धारेवर धरले या आंदोलनात भाऊसाहेब गवळी कायगावकर, ज्ञानेश्वरगायकवाड, संजय गायकवाड, रामदास माने, सदानंद गायकवाड, बापूसाहेब गायकवाड, संतोष गायकवाड, बाळासाहेब भोगे, इसाक पटेल, गणेश चव्हाण, गोकुळ बोरुडे, ओंकार बोरुडे, भागचंद नजन, अनिल घुंगाशे, नारायण वायसळ, दिनेश भोगे, सुनील निरपळ, कैलास निकम, श्यामभाऊ दाणे,



साईनाथ माने, दत्तात्रय माने, अण्णासाहेब वाडकर, अनिल मोरे मच्छिंद्र तागड गणेश मोरे, दिगंबर अण्णासाहेब वाडकर, अनिल मोरे, मच्छिंद्र तागड गणेश मोरे, दिगंबर क्षीरसागर, ऋषिकेश चव्हाण, अविनाश चव्हाण, नवाज पटेल, मासुम पठाण, यावेळी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांची उपस्थिती होती. पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## फिरोदिया आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेत

# ठाणे येथील विक्रमादित्य कुलकर्णी विजयी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**नगर** : बडी साजन मंगल कार्यालय येथे शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित अखिल भारतीय खुली बुद्धिबळ स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत बुद्धिबळ खेळण्यासाठी खेळाडू गुजरात, आंध्र प्रदेश, ड्यू दमन, गोवा, तमिळनाडू इत्यादी राज्यातून ३६० खेळाडू सहभागी झाले असून १७२ आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त खेळाडू देखील या स्पर्धेत होते. इंटरनॅशनल मास्टर विक्रमादित्य कुलकर्णी सहित अनेक दिग्गज खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. साडेपाच वर्षाचा बाळ खेळाडू तसेच ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडूंनी देखील या स्पर्धेत आपले बुद्धीचे कौशल्य दाखवण्यासाठी आले होते. या स्पर्धेतील विजयी खेळाडूंना बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी अहमदनगर जिल्हा उद्योग संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी, सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त पारुनाथ ढोकळे सर, शाम कांबळे, पंच प्रविण ठाकरे, सहाय्यक पंच शार्दूल तपासे, यशवंत पवार तसेच पालक प्रशिक्षक, खेळाडू उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सुबोध ठोंबरे, पारुनाथ ढोकळे, शाम कांबळे, प्रकाश गुजराथी, संजय खडके, देवेंद्र ढोकळे, रोहित आडकर, अनुराधा बापट, डॉ स्मिता वाघ, रोहिणी आडकर, दत्ता घाडगे, नवनीत कोठारी, देवेंद्र वैद्य इ चे सहकार्य लाभले. या स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे. प्रमुख विजेता गट प्रथम- विक्रमआदित्य कुलकर्णी, द्वितीय- प्रथमेश सहरला, तृतीय- हर्ष घाडगे, चतुर्थ -प्रज्वल आव्हाड, पाचवे- अक्षज पाटील,

सहावे- ऋषिकेश काबनोरकर, सातवे- अर्णव खेडकर, आठवे- विश्वजीत जाधव, नववे- ओमकार कडव, दहावे- शरणार्थी श्लोक, अकरावे- हृषिकेश चव्हाण, बारावे-खुशी अग्रवाल, तेरावे- राजसुंबा निरव, चौदावे- आराध्या टीकम, पंधरावे- नंकानी नील... अठराशे मानांकना खालील विजेते.. प्रथम- अथर्व सोनी, द्वितीय-यश कापडी, तृतीय-सुदीप पाटील, चतुर्थ-सौमिल गोगते, पाचवे- लालितादिताय्यानार बूमिणाठण, सहावे-लयेर चिन्मय, सातवे-अभय भोसले, आठवे-वीर शहा, नववे-कार्तिक कुंभार, दहावे-दर्श शेटे, अकरावे-रुपेश भोंगळ , बारावे-सतीश अनिरुद्ध , तेरावे-अभिजीत विक्रमाआदित्य, चौदावे-वैभव बोरसे, पंधरावे-ओम गाडे.. बिगर मानांकित विजेते प्रथम- महेक कटारिया, द्वितीय-भार्गव कविटकर, तृतीय-रोनक जकोटिया, चतुर्थ- झड रेयंश, पाचवे- आदित्य पवार, सहावे- क्षितिज पगर, सातवे-समृद्धी पाटील, आठवे- प्रिजेश वेल्लूयाठुपरंबिल.. बेस्ट वेटरण ६० प्रथम- ओ.पी तिवारी, द्वितीय-सुरेंद्र सरदार, तृतीय- मिलिंद पारले, चतुर्थ- दीपक ढेपे, पाचवे- ईश्वर रामटेके, सहावे- गिरीश थोरवेकर, सातवे- चंद्रकांत चौधरी, आठवे- सोमवंशी नातू.. उत्कृष्ट महिला. प्रथम- अवनी आचारे, द्वितीय- प्रतीती खंडेलवाल, तृतीय- तनवी बोरते, चौथे- श्रद्धा पडवेकर, पाचवे-स्वराली कोठे, सहावे- शर्वरी बाकलीवाल, सातवे- वेदिका पल, आठवे- सिद्धी बोमणे.. उत्कृष्ट अहमदनगर खेळाडू. प्रथम- आशिष चौधरी, द्वितीय- दीपक सुपेकर, तृतीय- सुनील जोशी, चौथे-श्रीराज इंगळे, पाचवे- परम गांधी, सहावे- आरुष आया, सातवे- शिवप्रसाद काळे, आठवे-अथर्व पाटील.. उत्कृष्ट १३ वर्षाखालील. प्रथम-आदित्य चव्हाण, द्वितीय- आरव लांडे, तृतीय- कुशाग्ररा पलवाल, चौथे-परम जलन, पाचवे-अलौकिक सिन्हा, सहावे-मधुकर कऱ्हाडे, सातवे-अर्णव धायगुडे, आठवे-शौर्य बगडियां.. उत्कृष्ट ९ वर्षाखालील. प्रथम- दर्श पोरवाल, दुतीय- गोरक्ष खंडेलवाल, तृतीय- नीव बाफना, चौथे- विश्वजा देशमुख, पाचवे- शौर्य भोंडवे, सहावे- श्रावणया बालगुडे, सातवे- अभयद्य दायमा, आठवे- देवांश भामरे.. उत्कृष्ट ७ वर्षाखालील. प्रथम- काविष भट्टाड, द्वितीय-शर्विल भागुरकर, तृतीय-शाश्वत देशमुख, चौथे-कैवल्या भरसकले, पाचवे- सुघोश कंकल. आधी खेळाडू विजयी झाले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारुणात ढोकले सर यांनी केले तर आभार खजिनदार सुबोध ठोंबरे यांनी मांडले.

## मार्कंडेय मंदिर येथे बेकायदेशीरपणे होणाऱ्या भूमिपुजनास विरोध

# न्याय मिळेपर्यंत लढा चालू ठेवणार : क्यादर

नगर : गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिर येथे स्वयंघोषित ट्रस्टींकडून बेकायदेशीरपणे भूमिपुजन सोहळ्याचे १० मे रोजी आयोजन केलेआहे, याच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालय येथे शरद क्यादर यांनी आमरण उपोषण सुरु केले यावेळी निवासी उप जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र पाटील यांनी चर्चा करून जिल्हाधिकारी यांच्या पत्राद्वारे पोलीस अधीक्षक यांना सूचित करण्यात आले की शरद क्यादर यांचे आमरण उपोषण स्थगित करावे व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, या लेखी आश्वासनाची प्रत शरद क्यादर यांना देण्यात अली त्या नंतर त्यांनी आपले आमरण उपोषण मागे घेतले. यावेळी शंकर सामलेटी,जयंत रंगा,राजू म्याना व सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापिका दगडे ,मुख्याध्यापक छिंदम,गोरे,मुत्याल व इतर कर्मचारी उपस्थित होते.

शरद क्यादर म्हणाले की श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान ट्रस्ट या संस्थेवर आज अखेर कोणीही अधिकृत ट्रस्टी व पदाधिकारी नाहीत श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान ट्रस्ट यांच्याबद्दल अर्ज उप धर्मादाय आयुक्त अहमदनगर यांनी कायदेशीर फेटाळला आहे असे असताना पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाच्या विरोधात काम करणारे काही लोक व विरोधी गटातील काही विघ्नसंतोषी लोक हे एकत्र येत त्यांनी बनावट निवडणूक घेतल्याची कागदपत्रे तयार करून तसा अर्ज सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांच्या कार्यालयात दाखल केलेला आहे त्या अर्जावर हरकत घेतलेली आहे असे असतानाही आम्हाला असे समजते की काही स्वयंघोषित विश्वस्त यांनी विघ्नसंतोषी लोकांना हाताशी धरून चुकून धर्मदाय आयुक्त यांच्या परिशिष्ट १ वर नाव असल्याचा गैरफायदा घेऊन एका ८५ वर्षीय वृद्ध इसमाची फसवणूक करून अहमदनगर महापालिकेच्या बांधकाम परवानगी अर्जावर सही घेऊन तसेच परवानगीसाठी अर्ज सादर करताना खोटे कागदपत्रे सादर करून आयुक्त अहमदनगर महापालिका यांच्याकडून बांधकाम परवानगी मिळवली, मात्र कोणत्याही धर्मदाय संस्थेच्या मालमत्तेची विक्री, सुधारणा, जीर्णोद्धार करायचा असल्यास धर्मदाय आयुक्त यांच्याकडे लेखी अर्ज सादर करून त्याची लेखी परवानगी घेऊन त्यानंतरच बांधकाम परवानगी मिळते पण श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान यांनी अशी कोणतीही परवानगी घेतलेली नाही व तसा कोणताही अर्ज अखेर सादर केलेला नाही तरी देखील बेकायदेशीरपणे भूमिपूजन सोहळा करण्याचे ठरविलेले आहे.

श्री मार्कंडेय मंदिर जीर्णोद्धार सोहळा बेकायदेशीर व तथाकथित लोकांनी आयोजित केलेला आहे याच्या नावाखाली पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ व श्री मार्कंडेय विद्यालय यांच्या ताब्यात वर्षानुवर्ष असलेल्या इमारती पाडण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे या शाळेमध्ये सुमारे १५०० ते १७०० विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही तसेच कोतवाली पोलीस स्टेशन यांनी अर्जाबाबत माहिती घेत मार्कंडेय देवस्थान वाद धर्मदाय आयुक्त पुणे यांच्या कोर्टात प्रलंबित आहे तसेच धर्मदाय आयुक्त अहमदनगर यांच्या कोर्टात अर्ज प्रलंबित आहे तरी आपण दिलेल्या अर्जाबाबत आपण या धर्मदाय आयुक्त यांच्या कोर्टात दाद मागावी तसेच सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे बांधकाम अथवा काही काम करू नये याबाबत गैर अर्जदार यांना सीआरपीसी १४९ प्रमाणे नोटीस बजावणी करण्यात आली आहे अशी माहिती देत याबाबत केलेले आमरण उपोषण हे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी लेखी आश्वासन दिल्याने मागे घेत असून न्याय मिळेपर्यंत लढा चालू ठेवणार असे शरद क्यादर यांनी सांगितले



# मार्कंडेय मंदिर सभामंडप भूमिपूजन कार्यक्रमास प्रारंभ



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर** : पदमशाली पंच कमिटी ज्ञाती समाज, श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्ट व समस्त पद्मशाली समाजाच्या वतीने दिनांक ८,९ व १० मे रोजी होणाऱ्या मार्कण्डेय मंदिर सभामंडप भूमिपूजन कार्यक्रमास सुरुवात झाली असून जास्तीत जास्त संख्येने समाज बांधव व भाविक भक्तांनी तीनही दिवस कार्यक्रमास उपस्थीत राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त पदमशाली समाजाच्या वतीने आवाहन केले आहे.

अत्यंत भक्तिमय वातावरणामधे कार्यक्रमास सुरुवात झाली असून मंदिरा बाहेर मोठे सभा मंडप थाटण्यात आले असून मंदिराचे बाहेरील बाजूस व आतील बाजूस सुंदरपणे विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिराचा आतील बाजूने व श्री मार्कण्डेय महामुनीना सुगंधित फुलांनी सजविण्यात आले आहे. सदरहू भूमिपूजन समारंभ संत महामुनिच्या हस्ते होणार असल्यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले आहे. दिनांक ८ मे रोजी सकाळी गणेश पूजन,श्री मार्कण्डेय महारुद्राभिषेक, सायंकाळी ७ वा. भजन संध्या व महाप्रसाद दिनांक ९ मे रोजी होम हवन , पूजाविधी सायंकाळी ७ वा. श्री रामभक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट प्रस्तुत हनुमान चालीसा व त्यानंतर महाप्रसाद व दिनांक १० मे २०२४ रोजी सकाळी ९ वा. श्री मार्कंडेय मंदिर सभामंडप भूमिपूजन समारंभ ह. भ. प. श्री जंगले महराज शास्त्री, डोंगरगण,प. पु. दिग्वजयनाथ महाराज, आळंदी व प. पू. संगमनाथ महाराज, श्री विशाल गणेश मंदिर यांच्या हस्ते व प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती समाजाच्या वतीने दिली असून या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने भाविक भक्तांनी उपस्थीत राहण्याचे आवाहन समस्त पदमशाली समाजाच्या वतीने केले आहे.

# शहरात दिव्यांगासाठी शाळा पूर्व वर्ग सुरू

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीचा प्रयत्न!



**नगर** : महानगरपालिका शिक्षण विभाग समग्र शिक्षा अभियान समावेशित शिक्षण अंतर्गत बालसुधारगृहाच्या केंद्रात शाळा पूर्व वर्ग सुरू करण्यात आले आहेत. या वर्गाद्वारे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेरचे प्राचार्य राजेंद्र बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली नगर शहरामध्ये हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक कौशल्यावर विशेष लक्ष देऊन विद्यार्थ्यां ची सद्यस्थिती लक्षात घेत त्याचे उद्दिष्ट ठरविण्यात येईल व त्यानुसार विद्यार्थ्यांना अध्यापन सहाय्य आणि पालक समुपदेशन केले जाणार असल्याचे केंद्राचे विशेष शिक्षक उमेश शिंदे यांनी सांगितले.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण असून, दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी फायदेशीर असल्याचे मनपा शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी सांगितले. या उपक्रमासाठी समन्वयक महेश क्षीरसागर, विशेष तज्ञ शरद पवार, शशिकांत गीते यांचे सहकार्य लाभले.

# मनपा उद्यानाची झालेली वाताहत व सुरु असलेली लूट थांबविण्यासाठी बागोड्या सत्याग्रह

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नगर** : शहरातील मनपा उद्यानाची झालेली वाताहात, तर काही उद्यानात सर्वसामान्यांची सुरु असलेली लूट थांबवून लहान मुलांना मोफत व आनंदी खेळाचा अधिकार मिळण्यासाठी पीपल्स हेल्पलाईनच्या लोकभज्ञाक चळचळीच्या माध्यमातून बागोड्या सत्याग्रह जारी करण्यात आला आहे. राजकीय नेत्यांच्या पंटरांना उद्यानाची खैरात करणारे व उद्यानाकडे दुर्लक्ष करणारे महापालिकेचे आयुक्तांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास लक्ष्मी उद्यानात विजेच्या खांबाला डांबून शनिवारी (दि.१८ मे) बागोड्या सत्याग्रह केले जाणार असल्याची माहिती ड. कारभारी गवळी यांनी दिली.

शहरातील सर्व सार्वजनिक उद्यानात मोठी लूट सुरु आहे. मरक्या घोड्यावर बसण्यासाठी ३० रुपये घेतले जातात. काही उद्यानात ठेकेदाराने मोठ्या प्रमाणात खासगी झोके लावले असून, ते नागरिकांकडून अव्वाच्यासव्वा रुपये वसूल करत आहे. उद्यानात व्यवसाय करणारे खासगी पाळणे अथवा खेळणे वाल्यांना मनपाने दर निश्चित करुन दिल्यास सर्वसामान्यांनी लूट थांबण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

कोणत्याही उद्यानामध्ये खेण्याची सोय नाही. अनेक खेळणे मोडकळीस आलेले असून, नागरिकांना खासगी पाळण्यांशिवाय पर्याय नाही. सर्व झाडे जळून जात असून, विशेष म्हणजे लक्ष्मी उद्यानासमोर जाणे-येण्याचा रस्त्याच्या कडेला वाहने पार्किंग केल्याने मुलांना उद्यानात जाण्यास देखील अवघड होत आहे. बागोड्या म्हणजे मुलांचा बागडण्याचा आणि आनंद लुटण्याचा अधिकार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

सध्या शाळांना सुट्ट्या लागल्या आहेत. दिवसभर उन्हामुळे मुले घरी असतात, संध्याकाळी मुलांना खेळण्याची संधी उद्यानामध्ये मिळण्याची आवश्यकता आहे. मनपाच्या अनागोंदीमुळे शहरातील उद्यानाची वाताहात झाली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

परदेशामध्ये लहान मुलांच्या आरोग्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. खेळाच्या सोयी मोफत उपलब्ध केल्या जातात. परंतु भारतात लहान मुलांवर अतिशय नकारात्मक संस्कार केले जातात. मुलांना त्यांचा खेळण्याचा हक्क मिळण्यासाठी हे आंदोलन जारी करण्यात आले असल्याचे ड. गवळी यांनी म्हंटले आहे. या आंदोलनासाठी ड. कारभारी गवळी, शाहीर कान्हू सुंबे, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, डॉ. रमाकांत मडकर, ओम कदम आदी प्रयत्नशील आहेत.

## जालिंदर बोरुडे यांचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्काराने गौरव




**नगर** : आर्थिक दुर्बल घटकातील दृष्टीदोष असलेल्या नागरिकांना मोफत शिबिराच्या माध्यमातून नवदृष्टी देण्याचे काम करणारे फिनिक्स सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांना जनकल्याण फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

गोंडेगाव (ता. नेवासा) येथे तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ समाजसेवक कॉ. बाबा आरगडे यांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक सुनिल गोसावी, प्राचार्य बी.पी. ढाकणे, निवृत्त पोलीस अधिकारी तथा कवी सुभाष सोनवणे, डॉ. अशोकराव ढगे, कवी भारत गाडेकर, प्राचार्य किशोर धनवटे, डॉ. अशोक ढगे, जनकल्याण फाऊंडेशनचे अध्यक्ष पांडुरंग रोडगे आदी उपस्थित होते.

जालिंदर बोरुडे फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या ३१ वर्षापासून शिबिर घेऊन हजारो गोरगरीब नेत्रदोष असलेल्या रुग्णांना मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया घडवून आणल्या असून, या सेवेच्या माध्यमातून अनेकांना नवदृष्टी मिळाली आहे. तर नागरिकांना मरणोत्तर नेत्रदानासाठी प्रोत्साहित करुन अनेकांचे मरणोत्तर नेत्रदान घडवून आनले आहे. नेत्र शिबिराबरोबरच समाजाची गरज ओळखून विविध आरोग्य शिबिर फाऊंडेशनच्या माध्यमातून ते घेत आहे. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना सदरचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जनकल्याण फाऊंडेशनचे अध्यक्ष पांडुरंग रोडगे, सुनिल गोसावी, कवी सुभाष सोनवणे व प्राचार्य ढाकणे यांनी आपल्या मनोगतामध्ये फिनिक्स फाऊंडेशनच्या माध्यमातून बोरुडे यांनी केलेल्या कार्याचे कौतुक केले. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# निवडणूक काळात आयोगाने पोलिसांना सुविधा पुरवाव्यात : शेलार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगांव** : पोलीस पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी नेहमीच व्यस्त असतात. यामध्ये निवडणुकीच्या काळात तर त्यांना घरच्या सुख-दुःखात देखील सहभागी होता येत नसून त्यांना जेवण करायला पण वेळ मिळत नाही. किमान निवडणुकीच्या काळात तरी निवडणूक आयोगाने पोलिसांना जेवणासह इतर मुलभूत सुविधा पुरवाव्यात, अशी मागणी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना संस्थापक अध्यक्ष राहुल भैय्या दुबाले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली केली


पोलिसांसाठी लढणारे शेवगाव तालुक्यातील पिंगेवाडी गावचा सुपुत्र महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना शेवगाव तालुका प्रमुख विकास भैय्या शेलार यांनी केली आहे.

शेवगाव तालुक्याचे तहसीलदार साहेब यांना महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेकडून निवेदन देण्यात आले. पोलीस अधिकारी कर्मचारी निवडणूक काळात आयोगाने पोलीस यांना सुविधा पुरविणे अशी मागणी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल भैय्या दुबाले,व योगेश भैय्या कदम यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव तालुका प्रमुख विकास शेलार यांनी सुविधा पुरविण्यासाठी मागणी केली तरी तहसीलदार साहेब यांनी लवकर आपण ही लवकर सुविधा करु असे आश्वासन दिले.शेवगाव तालुका चे तहसीलदार सांगडे साहेब यांनी दिले

पोलीस कर्मचारी बंदोबस्त ठिकाणी असताना त्यांना रस्त्यावरच झोपावे लागते. निवडणूक आयोगाने निवडणूक काळात निदान जेवणाची व झोपण्याची सुविधा पुरवावी. निवडणूक काळात जेवण व झोप तर लांबच, पोलीस कर्मचाऱ्यांना जीव गमवावा लागला तरी त्यांना त्यांचे कर्तव्य बजवावे लागते. सोलापूर या ठिकाणी एका पक्षाच्या सभेवर बंदोबस्त होता, त्यानंतर बंदोबस्त संपल्यावर आमच्या एक महिला कर्मचारी त्यांच्या घरी परतत असताना गाडीच्या अपघातात त्यांना आपला जीव गमावावा लागला असल्याचे पोलिसांनी सांगितले.

गृहमंत्री साहेब व निवडणूक आयोग यांना माझी एक विनंती आहे की, आमच्या पोलीस कर्मचाऱ्यांवर लक्ष द्यावे. पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी हे आपले कर्तव्य बजावत असतात, म्हणून माझ्या या विनंतीकडे निवडणूक आयोगाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी केली आहे.

## उन्हाच्या तडाख्याने पक्षी सुध्दा झाले चिंतातूर



**अजनुज** : या वर्षी मे महिन्यात सूर्य चांगलीच आग ओतत असून माणसा बरोबरच पशू पक्ष्यांना देखील चांगलेच ग्रासले असून अन्न,पाणी,सावली वाचून ते भटकंती करताना पाहवयास मिळत आहे. उष्णतेने ४० चा पारा गाठत आणला असून दुग्ध व्यवसाय देखील धोक्यात येऊ लागला आहे.गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील उदभवू लागला आहे,अति उष्णतेमुळे गायी उलटण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे दुग्ध व्यवसाय अडचणीत आल्याचे दिसून येत आहे.

# पैशांसाठी कोणतीही भूमिका करणाऱ्यांना तत्व नाही : अजित पवार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका केल्यामुळेच मागील निवडणुकीत डॉ. अमोल कोल्हे यांना मते मिळाली होती. पण, राष्ट्रपिता महात्मा गांधींचा खून करणाऱ्या नथुराम गोडसे यांची भूमिकाही कोल्हे यांनी केली. हा किती विरोधाभास आहे. पैशासाठी कोणतीही भूमिका करत असून त्यांना तत्व नसल्याची टीका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. चित्रीकरणात व्यस्त असल्याने त्यांच्याकडे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी वेळ नसल्याचेही ते म्हणाले.

शिरुरचे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव-पाटील यांच्या प्रचारासाठी पवार यांची आंबेगावातील घोडेगाव येथे बुधवारी (८ मे) सभा झाली. शिवसेनेचे उपनेते इरफान सय्यद, भाजपचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे-पाटील यावेळी उपस्थित होते.

कोल्हे यांना शोधून आणून उमेदवारी दिली. जीवाचे रान करुन निवडून आणले. मात्र, दोन वर्षांनी मी अभिनेता असल्याचे सांगत राजीनामा घेऊन आले होते, असे सांगत पवार म्हणाले, की यशवंतराव चव्हाण यांनी १९६७ ला शरद पवार



यांना संधी दिली. त्यामुळे ते आपले नेतृत्व सिद्ध करु शकले. पण, पवार यांनी १९८४ ला चव्हाण यांची साथ सोडल्याचे इतिहास सांगतो. मला शरद पवार यांनी संधी दिली. पण, आता आम्हाला म्हणतात या वयात पवार यांना सोडायला नको होते. त्यांनी १७ वर्षांत चव्हाण यांना सोडले. मी तर ३५ वर्षे साथ दिली. कारभार बघू द्या म्हटले पण बघू देत नव्हते. चूक केली तर आमचे कान धरा, पण काम करु द्या असे सांगत होते. पण, ऐकत नव्हते. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांची आम्ही विचारधारा सोडली नाही. त्याच विचारधारेने पुढे जात आहोत. सत्ता असल्याशिवाय लोकांना मदत करु शकत नाही. सत्ता नसल्यावर काही कामे करता येत नाहीत. निधी देता येत नाही, त्यासाठी सत्तेत गेलो, असेही ते म्हणाले.

लोक स्वार्थी शरद पवार आजारी आहेत. तरीही लोक त्यांना प्रचारासाठी बोलवितात. लोक स्वार्थी असतात. जोपर्यंत हातपाय व्यवस्थित आहेत. तोपर्यंत लोक आमच्या मागे येतात, असेही पवार म्हणाले.

रडून प्रश्न सुटणार नाहीत

यापूर्वी लोकसभेला आढळराव आणि विधानसभेला दिलीप वळसे-पाटील यांना मतदान होत असे. आता ते दोघेही एकत्र आहेत. त्यामुळे मोठे मताधिक्य मिळाले पाहिजे. कोल्हे यांनी पाच वर्षात पुणे-नाशिक रेल्वे, वाहूतक कोंडी सोडविण्यासाठी काहीच केले नाही. आता भावनिक करतील. रडून प्रश्न सुटणार नाहीत. रडून राजकारण करायचे नसते. आरेला-कारे करुनच राजकारण करायचे असते, असेही ते म्हणाले.

# मित्राने केली मित्राच्या गाडीची चोरी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**तळेगाव ढमढेरे :** कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथे एका मित्राने आपल्या मित्राची बुलेट दुचाकी विश्वासाने घेऊन जाऊन एक महिन्यापासून पसार झाला असल्याची घटना घडल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे बाबुराव मनवत वैराळे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथील अमोल कांबळे याची ओळख बाबुराव वैराळे याच्या सोबत झालेली असताना मार्च मध्ये बाबुराव याने मला गावाला जाऊन यायचे असल्याचे सांगून विश्वासाने अमोल याच्याकडे बुलेट दुचाकी मागितली असता अमोल याने त्याच्या जवळील एम एच १२ टी पी ७९८७ हि बुलेट दुचाकी दिली मात्र महिना होऊन गेला तरी बाबुराव दुचाकी घेऊन आला नाही तसेच फोन देखील उचलले नाही, त्यामुळे बाबुराव या मित्राने विश्वासघात करुन दुचाकी लांबवली असल्याचे लक्षात आल्याने अमोल महादेव कांबळे (वय ३३ वर्षे रा. कोरेगाव भीमा ता. शिरुर) याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असल्याने पोलिसांनी बाबुराव मनवत वैराळे (रा. कदमवाडी ता. बीड जि. बीड) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सचिन मोरे हे करत आहे.

# सोशल मिडीयावरचे बनावट अकाऊंट ठरतयं उमेदवारांची डोकेदुखी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**पुणे :** महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीची धामधुम जोरात सुरु असताना नेतेमंडळी प्रचारात व्यस्त आहेत. प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष सर्वच माध्यमातून उमेदवार आपला प्रचार करत आहेत. जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करत आहेत परंतु सध्या अनेक उमेदवारांना ट्रोलिंग चा सामना करावा लागत आहे. इंटरनेट स्वस्त झाल्यापासून सोशल मीडियाचा वापरदेखील मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यात बनावट फेसबुक, इन्स्ट्राग्राम, किंवा युट्युब वर बनावट प्रोफाईल तयार करून त्या प्रोफाईलवरुन उमेदवारांची भाषणे,जुनी भाषणे,कॉल रेकॉर्डींग,व्हिडीयो अर्धवट एडीट करुन त्यांत विनोदी किंवा आक्षेपार्य मजकूर जोडुन मिम किंवा रिल तयार करुन ते बनावट फेसबुक व इंस्टाग्राम अकाऊंट वरुन प्रसारित केले जात आहे. ह्यामध्ये अनेक उमेदवारांचे कार्यकर्ते आघाडीवर असुन काही कार्यकर्ते फक्त ह्याच कामसाठी नेमले आहेत,अनेक उमेदवारांना हा सोशल मिडीया वरचा प्रचार जड जाताना दिसतोय ठराविक उमेदवारांच्या कार्यकर्त्यांना त्या अप्रचाराला त्याच भाषेत उत्तर देण जमतय तर काही उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते त्यामध्ये खुपच मागे आहेत. स्वतःच्या नेत्याची प्रतिमा तयार करणे, प्रतिस्पर्धी उमेदवाराला टार्गेट करणे, खोटे सर्वे पसरवणे त्यामुळे सोशल मीडियावरील बनावट अकाऊंटमुळे अनेक उमेदवारांची डोकेदुखी वाढली आहे. त्याच बरोबर लोकसभा निवडणुकीच्या १ महिणा अगोदर तयार झालेले युट्युब न्युजचनल त्यावर एडिट केलेले सर्वे ,ठरावीक उमेदवाला टार्गेट करणारे सर्व्हे,जनमत हेदेखील उमेदवारांना त्रासदायक ठरत आहे.

# शिक्रापुरात निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर वाहनांची कसून तपासणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** सध्या लोकसभा निवडणुकीचे बिगुल रंगत असताना निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गैरप्रकार रोखण्यासाठी निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पोलिसांच्या वतीने वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) येथे पुणे नगर महामार्गावर वेगवेगळ्या रस्त्यांवर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असताना निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, महिला पोलीस उपनिरीक्षक माधुरी झेंडगे, पोलीस हवालदार मंगेश लांडगे, मिलिंद देवरे यांसह आदींच्या माध्यमातून वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे, तर पोलिसांच्या सतर्कतेमुळे होणारे गैरप्रकार निश्चितच रोखले जाणार आहे मात्र नुकत्याच काही ठिकाणी तिसऱ्या टप्प्यात पार पडलेल्या निवडणूक मतदान दरम्यान पुणे जिल्ह्यात काही भागात गोंधळ झाल्याने तपासणी अजून कडक करण्यात येणार असल्याचे देखील पोलिसांनी सांगितले.



शिक्रापूर (ता. शिरुर) येथे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाहनांची तपासणी करताना पोलीस. (छायाचित्र : आकाश भोरडे)

# पोलिसांचा खबरी असल्याच्या संशयावरुन तलवारीने वार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पोलिसांचा खबरी असल्याच्या संशयावरुन टोळक्याने एका ज्येष्ठावर तीक्ष्ण शस्त्राने वार केल्याची घटना हडपसरमधील रामटेकडी परिसरात घडली. या प्रकरणी पोलिसांनी ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

पंजाबसिंग फौजीसिंग कल्याणी (वय ६५, रा. रामटेकडी, हडपसर) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी रवीसिंग शामसिंग कल्याणी, हुकूमसिंग रामसिंग कल्याणी, रामसिंग मोहनसिंग कल्याणी, अजयसिंग हुकूमसिंग कल्याणी, ऐलानसिंग रामसिंग कल्याणी, जिंदालसिंग रामसिंग कल्याणी, हिंदूसिंग रामसिंग कल्याणी, राजूसिंग रामसिंग कल्याणी, निहालसिंग शामसिंग कल्याणी, सोनीहालसिंग शामसिंग कल्याणी, बसंतीकौर शामसिंग कल्याणी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवारी रात्री पंजाबसिंग कल्याणी रामटेकडी परिसरात घरासमोर थांबले होते. त्यावेळी आरोपी तेथे आले. पोलिसांना दरोडा टाकल्याची खोटी माहिती दिल्याचा आरोप करून त्यांनी पंजाबसिंग यांच्यावर तलवारीने हल्ला चढविला. त्यांच्या डोक्यात तलवारीने वार केला. त्यावेळी पंजाबसिंग यांचा नातू धनराजसिंग याने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. आरोपींनी त्याच्या हातावर तलवारीने वार केला.

आरोपींनी तलवारी उगारून दहशत माजविली, तसेच परिसरातील वाहनांची तोडफोड केली. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पतंगे, गुन्हे शाखेचे निरीक्षक करणकोट यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक सोनवणे तपास करत आहेत.

# तरुणाला जमावाची मारहाण ; ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** शहरातील राजवाडा रोड परिसरात कपड्याच्या दुकानात मित्रांबरोबर गप्पा मारत बसलेला तरुणाला सहा जणांनी लाकडी दांडके तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना ( दि.६) मध्यरात्री घडली असून याबाबत भोर पोलिसात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.कुणाल कुमार धुमाळ वय ३२ रा.भोर असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे.या प्रकरणी गणेश ज्ञानोबा पवार,सचिन तुकाराम चुनाडी,मंगेश संतोष ओतारी,समीर सुरेश शेटे,जॉन्टी शेटे (पूर्ण नाव माहीत नाही ) बालाजी शेटे (पूर्ण नाव माहित नाही) यांचे विरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३२३,३२४ ,५०४,५०६,१४३,१४७,१४८ महा. पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७१ (१)व (३)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी पोलिसांनी दिलेली माहिती अशी,फिर्यादी शहरातील राजवाडा रोड परिसरातील एका कपड्याच्या दुकानात मित्रांसोबत गप्पा मारत बसला होता.दरम्यान त्या ठिकाणी आरोपी गणेश पवार हातात लाकडी दांडके घेऊन आला व फिर्यादीस शिवीगाळ करत तुला लय माज आला आहे.तुझा माज उतरवतो तुला मी शोधतच होतो .बरे झाले तू माझ्या कचाट्यात सापडला असे म्हणत हातातील दांडके तसेच लाथाबुक्क्यांनी



मारहाण केली.फिर्यादी दुकानाच्या बाहेर येताच आरोपीच्या इतर पाच मित्रांनी संगणमत करून शिवीगाळ तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आह.पोलीस निरीक्षक अण्णासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनिल चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

# खाणाखुणांतुन दिलेल्या साक्षीमुळे आरोपीला १० वर्षांची शिक्षा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** विशेष मुलीवर झालेल्या बलात्कार प्रकरणात मुलीने खाणाखुणांनी न्यायालयात साक्ष दिली. पीडित मुलीची साक्ष खटल्यात महत्त्वाची ठरली. न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून जिल्हा सत्र न्यायाधीश डी. पी. रागीट यांनी आरोपीला दहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. आरोपीला न्यायालयने दहा हजार रुपये दंड भरण्याचे आदेश दिले असून, दंड न भरल्यास न्यायालयने एक वर्षाच्या शिक्षेची तरतूद निकालपत्रात केली आहे. प्रताप बबनराव भोसुरे (वय ५९ रा. धानोरे ता. शिरूर जि. पुणे) असे शिक्षा सुनावलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत पीडित मुलीच्या आईने शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. १८ मे २०१५ रोजी मुलगी रानात शेळ्यांना घेऊन गेली होती. आरोपी भोसुरेने तिला गोळी देण्याचे आमिष दाखवून रानातील एका निर्जन जागेत तिच्यावर बलात्कार केला. बलात्कारानंतर मुलगी गर्भवती झाली. आरोपीला याप्रकरणात अटक करण्यात आली होती. तेव्हापासून गेले आठ वर्षे ११ महिने आरोपी येरवडा कारागृहात आहे. या खटल्यात सरकार पक्षाकडून ड. लीना पाठक यांनी बाजू मांडली. सरकार पक्षाकडून नऊ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली होती. पीडित मुलीने न्यायालयात खाणखुणांनी साक्ष दिली. कॅमेऱ्याद्वारे मुलीची साक्ष नोंदवून घेण्यात आली. साक्ष, तसेच वैद्यकीय पुरावे ग्राह्य धरून न्यायालयने आरोपीला दहा वर्षे सक्तमजुरी आणि दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. शिक्रापूर पोलीस ठाण्याचे तत्कालिन सहायक पोलीस निरीक्षक हेमचंद्र खोपडे यांनी याप्रकरणाचा तपास केला. न्यायलयीन कामकाजात पोलीस हवालदार विद्याधर निचित, एस. बी. भागवत, ज्ञानदेव सोनवणे यांनी सहाय केले.

# संत गोरोबा काका यांच्या पुण्यतिथीनिम्मित तीन दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह संपन्न

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** कुंभार येथील मंदिरात संत गोरोबा काका यांची पुण्यतिथी सप्ताह,ग्रामप्रदिक्षिना व किर्तनासह विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली.

शिरूर येथील कुंभार आळीतील श्री विठ्ठल रूक्मिणी व संत गोरोबा काका मंदिराला संत गोरोबा काका यांच्या पुण्यतिथी निम्मित फुलांची सजावट व आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती या विद्युत रोषणाईने मंदिर परिसर उजळून निघाला होता.

संत गोरोबा काका यांच्या पुण्यतिथीनिम्मित यावर्षी तीन दिवशीय अखंड हरिनाम सप्ताह साजरा करण्यात आला. पुण्यतिथीच्या दिवशी सकाळी विठ्ठल रुक्मिणी मूर्तीला अभिषेक करण्यात आला.शिरूर शहरातील कुंभार आळी येथील श्री विठ्ठल मंदिरापासुन टाळ-मृदूंगाच्या गजरात सजवलेल्या पालखीतून संत गोरोबा काका यांच्या प्रतिमेची शहरातुन पालखी मार्गाने मिरवणुक काढण्यात आली.यावेळी परिसरातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते. यावेळी मिरवणुकीत विठ्ठल रुक्मिणी व माती तुडवणारे व चकावर मडकी घडवणारे गोरोबा काका यांचा लहानग्यांकडून सादर करण्यात आलेल्या जिवंत देखाव्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते.निळोबाराय वारकरी शिक्षण मंडळाच्या मुलांचे टाळकरी - गायक व वादक यांच्या संपूर्ण टीमने मिरवणुकीत भक्तिमय रंगत आणली.यावेळी अनेक भाविक मिरवणुकीत सामील झाले होते.ग्रामप्रदिक्षिना मिरवणूक कुंभार आळी येथे विठ्ठल मंदिरात आल्यानंतर सकाळी ११ वाजता ह भ प प्रांजलताई सोमवंशी यांचे सुश्राव्या कीर्तन झाले.दुपारी १२ वाजता महाआरती करण्यात आली.यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल मंदिर ट्रस्ट,शिरूर व शिरूर तालुका कुंभार समाजाच्यावतीने परिश्रम घेतले अशी माहिती कुंभार समाजाचे तालुकाध्यक्ष योगेश जामदार यांनी दिली.



# वाजेवाडीला चासकमानचे पाणी सोडण्याची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** सध्या सर्वत्र उन्हाळा जाणवत असताना पाण्याची देखील मोठी टंचाई निर्माण झालेली असताना वाजेवाडी येथील पाझर तलावाचे पाणी कमी झाल्याने गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीच्या पाण्याची पातळी खालवल्याने नागरिकांना पाण्याच्या संकटाचा सामना करावा लागत येथील पाझर तलावाला पिण्यासाठी चासकमान कालव्याचे पाणी सोडण्याची मागणी ग्रामपंचायतच्या वतीने चासकमान विभागाच्या अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

वाजेवाडी (ता. शिरुर) येथील पाझर तलावातील पाणी साठ्यामुळे विहिरीच्या पाणीपातळीतून गावासह परिसरातील वाड्या वस्त्यांना पाणीपुरवठा केला जातो, तसेच येथील अनेक वाड्या वस्त्यांवरील शेतीचे तसेच नागरिकांचे पाण्याचे स्त्रोत या तलावावर अवलंबून आहे, सदर तलावाची पाण्याची पातळी वाढल्यास नागरिकांना देखील शेतीतील पिकांना पाणी देणे शक्य होत असून नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची मोठी सोय होत असते. मात्र सध्या येथील तलाव कोरडा पडू लागला असल्याने नागरिकांना पाण्याचा दुष्काळ जाणवत आहे, त्यामुळे येथील तलावासाठी चासकमानचे पाणी सोडण्याची मागणी वाजेवाडी ग्रामपंचायतने चासकमान विभागाकडे केली असून यावेळी माजी सरपंच धर्मराज वाजे, नितीन वाजे, ज्ञानेश्वर चौधरी, संतोष वाजे, चंद्रकांत धनवडे, रवींद्र वाजे यांसह आदी ग्रामस्थ उपस्थित होते. येथील तलावाला पाणी सोडल्यास गावातील पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीची पातळी वाढून गावाला पाणीपुरवठा होऊ शकतो त्यामुळे आपण तातडीने वाजेवाडी पाझर तलावात चासकमान कालव्याचे पाणी सोडावे अशी मागणी करण्यात आलेली आहे.

**पाण्याचा उपलब्ध साठा पाहून निर्णय घेऊ : श्रीकृष्ण गुंजाळ (मुख्य अभियंता)**

वाजेवाडी ग्रामपंचायत ने पाझर तलावाला पाणी सोडण्याची मागणी केली मात्र सध्या सिंचनसाठी पाणी सुरु असून ते पाणी हेड पर्यंत पोहचाल्यानंतर पाणी साठ्यानुसार पुढील विचार केला जाणार असल्याचे चासकमान विभागाचे मुख्य अभियंता श्रीकृष्ण गुंजाळ यांनी सांगितले.



वाजेवाडी (ता. शिरूर) गावाला चासकमानचे पाणी सोडण्याची मागणी करताना ग्रामस्थ. (छायाचित्र : आकाश भोरडे)

द•ख•ल

## शिंगाडवाडी येथे बंद घराचे कुलूप तोडून चोरी

**तळेगाव ढमढेरे :** वरुडे (ता. शिरुर) येथील शिंगाडवाडी मध्ये राहणारे तुळशीराम शिंगाडे हे त्यांच्या घराला कुलूप लावून बाहेर गेलेले होते, ७ मे २०२४ रोजी सकाळच्या सुमारास तुळशीराम यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तुटलेले तसेच दरवाजा उघडा असल्याचे शेजाऱ्यांना दिसले त्यांनी तुळशीराम यांना फोन करुन याबाबत माहिती दिल्याने त्यांनी घरी येऊन पाहणी केली असता घरातील सर्व साहित्य अस्ताव्यस्त पडलेले तसेच कपाट उघडे असल्याचे दिसल्याने तुळशीराम यांनी कपाटाची पाहणी केली असता कपाटातील साडेतीन तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व रोख बारा हजार रुपये असा अंदाजे एक लाख सात हजारांचा ऐवज चोरीला गेल्याचे समोर आले, याबाबत तुळशीराम रघुनाथ शिंगाडे (वय ३५ रा. शिंगाडवाडी वरुडे ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक केशव वाबळे हे करत आहे.

## शिंगवे येथे रंगला कुस्ती आखाडा



**शिंगवे पारगाव :** भैरवनाथ यात्रेनिमित्त शिंगवे येथे कुस्त्यांचा जंगी आखाडा पार पाडला. त्यामध्ये नामवंत पैलवानांनी सहभाग घेतला. अनेक कुस्त्या चितपट झाल्या. विजेत्या पैलवानांना रोख बक्षिसे देण्यात आली. सायंकाळी कुस्त्यांचा आखाडा पार पडला. लहान मुलांच्या कुस्त्या झाल्यानंतर इनामी कुस्त्यांना सुरुवात झाली. पुणे जिल्ह्यातील अनेक नामवंत पैलवानांनी आखाड्यात सहभाग घेतला. अनेक कुस्त्या चितपट झाल्या. ग्रामस्थांच्या वतीने विजेत्या पैलवानांना रोख बक्षिसे देण्यात आली. मुलींच्या कुस्त्यांनी उपस्थितांची वाहवा मिळविली. पंच म्हणून दादु पाबळे, राजेंद्र पाबळे,रामकृष्ण राजगुरू,आनंदराव वाव्हळ,रामदास जगताप यांनी काम पाहिले. ग्रामस्थ,आदी मान्यवर उपस्थित होते.

## नगर रस्त्यावरील खराडीत गोदामास आग

**पुणे :** खराडीतील गोदामात आग लागल्याची घटना बुधवारी दुपारी घडली. आग लागल्यानंतर मोठा धूर झाल्याने परिसरात घबराट उडाली. महापाालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई करून जप्त केलेले साहित्य गोदामात ठेवले होते. आगीमागचे कारण समजू शकले नाही, अशी माहिती अग्निशमन दलाने दिली. खराडीत शिंदे डेअरीजवळ असलेल्या गोदामात महापालिकेने एका गोदामात अतिक्रमण कारवाईत जप्त केलेले साहित्य ठेवले होते. बुधवारी दुपारी अडीचच्या सुमारास गोदामातून मोठ्या प्रमाणावर धूर येत असल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. गोदामातील साहित्याने पेट घेतल्याने आग भडकली. मोठ्या प्रमाणावर धूर निर्माण झाल्याने परिसरात घबराट उडाली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे सात बंब घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

## मतदाना नंतर बारामतीत गोळीबार

**बारामती :** वारजे भागाचा समावेश बारामती लोकसभा मतदारसंघात होता. मतदान पार पडल्यानंतर गोळीबार करण्यात आल्याची घटना घडल्यानंतर परिसरात घबराट उडाली. वारजे परिसराचा समावेश बारामती लोकसभा मतदारसंघात होता. मतदान शांततेत पार पडल्यानंतर वारजे भागातील रामनगर परिसरात गोळीबार झाल्याची माहिती पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला मंगळवारी रात्री पावणेअकराच्या सुमारास पोलिसांना मिळाली. या घटनेची माहिती मिळताच वारजे पोलीस आणि गुन्हे शाखेतील पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. रामनगर भागातील शक्ती चौकात रात्री पावणेअकराच्या सुमारास दुचाकीवरुन आलेल्या तिघांनी पिस्तुलातून गोळीबार केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. आरोपींनी हवेत गोळीबार केला असून, गोळीबारामागचे कारण समजू शकले नाही. गोळीबार करणारे आरोपी मुंबई-बंगळुरु बाह्यवळण मार्गाने दुचाकीवरुन कात्रजकडे पसार झाले आहे. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत असल्याचे वारजे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज शेडगे यांनी सांगितले.

## निवडणुकीसाठी कर्तव्यार्थ पोलीस अधिकारी व कर्मचारी

**बीड :** मतदानापासून कोणतेही अधिकारी, कर्मचारी वंचित राहू नये यासाठी, बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत येणारे २३०-बीड विधानसभा मतदारसंघात दि.९, ते दि.११ आणि दि.१२ मे रोजी पोस्टल मतदान घेण्यात येणार, असल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, कविता जाधव यांनी कळविले आहे. बीड विधानसभा मतदारसंघा अंतर्गत कार्यरत पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी बीड तहसील कार्यालयात सुविधा केंद्र या ठिकाणी सकाळी ०९ ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.



# छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा प्रोफेसर चौकात बसवा

## अन्यथा ११ मे पासून छावा संघटनेने दिला आमरण उपोषण करण्याचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर** : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या १४ मे जयंतीच्या दिवशी प्रोफेसर चौकात पुतळा बसवण्याच्या मागणीसाठी अनेक पत्रव्यवहार करून देखील अद्यापही कारवाई करण्यात आलेली नसल्याने छावा संघटनेच्या वतीने अहमदनगर महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे की १४ मे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुतळा बसवण्यात यावा अन्यथा ११ मे पासून उपोषण सुरू करणार असल्याचे निवेदन देण्यात आले यावेळी छावा संघटनेचे महिला जिल्हा अध्यक्ष सुरेखाताई सांगळे, शिवप्रतिष्ठान जिल्हा अध्यक्ष बापू ठाणगे, दत्ताभाऊ वामन, दीपक गहिले, किरण वाघ, भैय्या पठाण, केशव बरकते, अभय पतंगे, शंकर आटोळे, विलास कराळे, साहेबराव पाचारणे, सुनील ठाकरे आदीसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, छावा संघटनेच्या वतीने प्रधान सचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांना दि. २ मे २०२२ रोजी व दि. २३ जून २०२२ रोजी पालकमंत्री यांना दि. १ मे २०२३ रोजी ना हरकत मिळण्याबाबत पत्रव्यवहार केला असून त्यांचा पाठपुरावा आम्ही केला असून अप्पर मुख्य सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांना पण वरील दि. २ मे २०२२ व २३ जून २०२२ रोजी पत्र देऊन सदर विभागाचे ना हरकत आलेली असून वर्क ऑर्डर झालेली असून काम चालू असून छत्रपती संभाजी राजे जयंती पूर्वी लवकरात लवकर पुतळा बसवण्यात यावा अन्यथा प्रोफेसर चौक अहमदनगर येथे अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेच्या वतीने ११ मे २०२४ रोजी आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# पाणी मिळाले नाही तर मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा

## शिरूर तालुक्यातील म्हसे येथील शेतकरी आक्रमक



**म्हसे परिसराला कुकडी नदीचे पाणी न सोडल्यास लोकसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचा ईशारा ग्रामस्थांनी दिला आहे. पाणी वापर संस्थेचे मुख्य पदाधिकारी प्रकाश वायसे व घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे संचालक व राज्याचे ज्येष्ठ मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे ज्येष्ठ समर्थक सोपानराव भाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने पाटबंधारे विभागाचे अधिकारी कडुसकर यांची भेट घेऊन माहिती दिली आहे .**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : कुकडी नदीच्या टेल भागातील शेतकऱ्यांना पाणी मिळावे यासाठी घोड व कुकडी कालवा सल्लागार समिती सदस्य प्रकाश वायसे व घोडगंगाचे तज्ञ संचालक तसेच राज्याचे ज्येष्ठ मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे ज्येष्ठ समर्थक सोपानराव भाकरे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि.७) परिसरातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने कार्यकारी अभियंता प्रशांत कडुसकर यांची भेट घेऊन निवेदन दिले. कुकडी डावा कालव्याला १ मार्च ते ८ एप्रिल या दरम्यान ३९ दिवस पाणी सुरू असतानाही ते पाणी कुकडी नदीच्या टेल भागातील म्हसे बुद्रुक व म्हसे खुर्द च्या बंधाऱ्यात आले नाही. पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. कुकडी नदीवरील वरील सर्व बंधाऱ्यांमध्ये पाणी असून टेलचे शेतकरी मात्र पाण्यापासून वंचित राहिले आहेत ,अशा संतप्त प्रक्रिया उमटत आहेत. जर दोन दिवसात पाणी मिळाले नाही तर येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा येथील शेतकऱ्यांनी दिला आहे. यावेळी रखमा निचित, एकनाथ मुसळे , बाळासाहेब शिंदे , सुभाष शिंदे , बाळासाहेब पवार, हरिभाऊ मुसळे , प्रवीण मुसळे , बिभीषण वराळ , अनिल बढे , सुभाष कोल्हे आदी शेतकरी उपस्थित होते.

पारनेर व शिरुर तालुक्यातील म्हसे खुर्द व म्हसे बुद्रुक हे दोन गावांमध्ये कुकडी नदीचे क्षेत्र आहे कुकडी नदीला पाणी आल्याने या दोन्ही गावांचा फायदा होतो मात्र कडक उन्हाळा व पाण्याची टंचाई यामुळे हे दोन्ही गावांतील ग्रामस्थ व शेतकरी हतबल झाले आहेत. पाणी न मिळाल्यास मतदानावर बहिष्कार हा निर्णय झाला असून यासाठी नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील पुढारी तसेच आंबेगाव - शिरुर लोकसभा मतदारसंघातील पुढारी काय भुमिका घेतात याकडे जनतेचे लक्ष वेधले आहे. राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या यात्रेसाठी कुकडीला पाणी सोडण्याची मागणी जनतेतून करण्यात आली होती यासाठी सुद्धा पाणी न मिळाल्यास मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचा ईशारा ग्रामस्थांनी दिला होता. जिल्हाधिकारी साहेब यांनी दखल घेऊन पाणी सोडण्याचा निर्णय घेतल्याने यात्रेसाठी पाणी सोडण्यात आले होते. आत्ता म्हसे येथील जनतेने निवडणूकीवर बहिष्कार घालणार असल्याचा ईशारा दिला असून पुढारी लक्ष घालतात की जिल्हाधिकारी लक्ष घालतात याकडे लक्ष वेधले आहे.

# युवकांनी आपल्यातील कला-गुणांचा विकास करुन गावाचे नाव उज्ज्वल करावे : सुभाष लांडगे

नगर : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे कार्य आणि विचार आपणा सर्वांना आजही मार्गदर्शक असेच आहे. आज गावातील अनेकजण नोकरी-व्यवसायानिमित्त शहरात गेले आहेत, परंतु त्यांची गावाशी नाळ कायम आहे. गावातील प्रत्येक उत्साहातील त्यांचा सहभाग आणि सहकार्याने मोठ्या प्रमाणात साजरा होतो. सिने अभिनेते गणेश वाघमारे यांनी आपल्या कलाने नाट्य-सिनेसृष्टीत जे स्थान मिळविले, त्याचा गावाला अभिमान आहे. नवयुवकांनी आपल्यातील कला-गुणांचा विकास करुन गावाचे नाव उज्वल करावे, असे आवाहन पोलिस पाटील सुभाष लांडगे यांनी केले.



अकोले तालुक्यातील कळंब येथे आदर्श गौतम सामाजिक तरुण मंडळ व ग्रामस्थांच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सिनेअभिनेते गणेश कृष्णाजी वाघमारे होते. कार्यक्रमास पोलिस पाटील सुभाष लांडगे, संतोष खरात, भरत जाधव, मनोज खरात, दिपक देठे आदि उपस्थित होते. सरपंच उत्तम लांडगे, उपसरपंच शकुंतलाबाई खरात, सदस्य भाऊसाहेब भोर, यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.प्रारंभी बौद्धाचार्य भाऊसाहेब देठे व शांताराम देठे यांनी बुद्धवंना केली. त्यानंतर महिला मेळावा संपन्न झाला. शिवकृपा हॉस्पिटलच्यावतीने उपस्थितांची मोफत आरोग्य तपासणी करुन उपचार करण्यात आले. सायंकाळी महापुरुषांच्या प्रतिमांची गावातून वाजत-गाजत मिरवणुक काढण्यात आली. यानंतर मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी नाट्य व सिनेसृष्टीतील योगदानाबद्दल गणेश वाघमारे यांचा 'सन्मानपत्र' देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी तंटामुक्ती अध्यक्ष गुलबराव जाधव, ग्रा.पं.सदस्या शोभाताई गायकर, सोसायटीचे चेअरमन बबू भोर, सचिव बाळू देठे, यशोमंदिर पतसंस्थेचे संचालक शिवाजी गवांदे (मुंबई), संतोष मदने, बाळासाहेब देठे आदि उपस्थित होते. प्रास्तविक किरण देठे यांनी केले तर सूत्रसंचालन संदिप देठे, यांनी केले. शेवटी बाळासाहेब रामचंद्र देठे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुभाष देठे, सुनिल खरात,गणेश गोंदके, विनोद वाघमारे, शांताराम देठे, जयकिसन देठे, दिगंबर देठे, शरद टपाल, प्रकाश देठे आदिंसह समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय गौरवसाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त ३१ मे रोजी विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा राज्यस्तरीय अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय गौरवाने सन्मानित केले जाणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, उद्योजक, अध्यात्मिक, पत्रकारिता, आरोग्य, पर्यावरण, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांना प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हा जयंती सोहळ्याचा कार्यक्रम सावेडी येथील माऊली सभागृहात होणार आहे. या कार्यक्रमाप्रसंगी सुप्रसिद्ध निसर्गोपचार तज्ञ संजीवनी स्वागत खेडकर यांचे महिला आरोग्य, निसर्गोपचाराद्वारे विविध उपचार पद्धती या विषयावर व्याख्यान होणार आहे. तर प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट महिलांना सौंदर्य खुलविण्यासाठी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणार असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्ट तथा अहिल्या फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. कावेरी कैदके व सुवर्णा कैदके यांनी दिली.

अनेक मान्यवरांच्या हस्ते महिलांचा गौरव केला जाणार असून, २० मे पर्यंत आपले प्रस्ताव अहिल्या मेकओव्हर, एकविरा चौक, पाईपलाईन रोड या पत्त्यावर पाठवावे. अधिक माहितीसाठी ९९२१७१२३१२ क्रमांकवर संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

# रेल्वे स्टेशन परिसरात राष्ट्रवादीची खा.विखेंच्या प्रचारार्थ प्रचार फेरी





**नगर** : प्रभाग क्रमांक १५ मध्ये अ.नगर दक्षिण लोकसभा महायुतीचे लोकप्रिय उमेदवार खा. सुजय विखे पाटील यांच्या प्राचारार्थ कार्यसम्राट आ. संग्रामभैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली घरोघरी जाऊन लोकांशी संवाद साधत, मायबाप जनतेला महायुतीचे उमेदवारास मतदान करण्याची साद घातली.

यावेळी युवानेते मयुर बांगरे (बालीशेठ) पै. दीपक लोंढे, नीलेशभैय्या बांगरे , शरद दळवी, सोमाशेठ रोकडे,पै. सचिन पवार, पै. संदेश इंगळे , पै. प्रशांत हातरूनकर, मयुर पवार, बंटीसर जाधव, नितीन लिंभोरे, कुमार डाके, अविनाश पाटिल, यशवंत बदलावाले , रोहित साळवे, आदित्य वाघमारे, धनेश चव्हाण, आकाश हातरूनकर, सौरभ खंडेराव, वैभव भवरे, सुरज आकसे आदींसह सर्व संग्राम भैय्या जगताप मित्र परीवार व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# निवडणूक प्रचारात सोशल मीडिया सक्रिय

**नगर :** उन्हाचा वाढता ताप, थेट मतदारापर्यंत 'रीच', तुलनेने स्वस्त आणि प्रभावी माध्यम म्हणून निवडणुकीत सोशल मीडिया 'टॉप ट्रेंडिंग'मध्ये आहे. त्यामुळे राजकीय पक्षांच्या सोशल मीडिया हँडल्सबरोबरच जास्त फॉलोअर्स असलेल्या इन्फ्लूएन्सर्सला चांगले दिवस आले आहेत.

निवडणूक म्हटले की गावोगावी फिरणारी प्रचाराची वाहने, सोसायटीपर्यंत मत मागायला येणारे कार्यकर्ते, चौकाचौकांत होणाऱ्या सभा आणि रस्त्यांवर रॅलीचा धुरळा, असे काहीसे स्वरूप असायचे.

पण यंदा प्रचारदूत म्हणून सोशल मीडिया ट्रेंडिंगमध्ये असून, लोकांची मते बनविण्यासाठी त्याचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. पक्षांचे जाहीरनामे मतदारांपर्यंत पोहचविण्यापासून ते विरोधी नेत्यांचे वक्तव्य खोडण्यापर्यंत सोशल मीडियाचा आधार घेतला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून मतदानाच्या दिवशी 'हवा' फिरविण्यासाठी देखील याचा वापर होत आहे.

वॉर रूम : नेते किंवा पक्षाच्या प्रचारासाठी कार्यकर्त्यांनी भरलेल्या कार्यालयांबरोबरच आता सोशल मीडियाची वॉर रूमही करण्यात आली आहेत. ज्याद्वारे प्रचाराला इव्हेंटचे स्वरूप देत नेत्यांचे व्हिडिओ, फोटो, संदेश तयार करण्यात येत आहेत. ट्रेंडिंगमध्ये काय आहे, आपला कंटेंट काय असावा अशा स्ट्रॅटेजीने सध्या वॉर रूमचे वातावरण तापत आहे. जसे मतदान जवळ येत आहे, तसे 'सोशल' वॉर वाढत आहे.

अर्धसत्य किंवा खोटी माहिती दिल्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होत आहेत. राजकीय विचारधारांच्या समर्थकांकडून सोशल मीडियावर हेतुपुरस्सर खोटी माहिती पसरवली जात असून, त्यातून नेमके खरे काय आहे? याचा शोध मतदारांना घ्यावा लागणार आहे. येत्या काळात हे आव्हान वाढणार असून, माध्यम साक्षरतेची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

उमेदवाराचे किंवा नेत्यांचे जुने व्हिडिओ काढून मीम्सच्या स्वरूपात फिरविले जात आहेत. त्यामुळे दोन्ही बाजूंच्या समर्थकांमध्ये सोशल मीडिया पोस्टचे वॉर सुरू आहेत तर दुसरीकडे यूट्यूब चॅनल्सकडून उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जात असून, अधिकृतपणे सोशल मीडिया कंटेंटही विकसित करण्यात येत आहे. ज्याचे फॉलोअर्स जास्त, त्याला या ट्रेंडिंगच्या जमान्यात जरा जास्त भाव आहे. समारोपाच्या सत्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण महाराष्ट्र राज्य सुकाणू समिती सदस्य प्रा. डॉ. प्रशांत मगर म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरण यशस्वीपणे राबविण्यासाठी शिक्षण संस्थांनी पुढील पाच वर्षाचा शैक्षणिक व पायाभूत सुविधांचा आराखडा तयार करून कार्यवाही करावी.' नवीन शैक्षणिक धोरणात अध्यापकांचा कार्यभार, शिक्षक भरती या विषयीही त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत १३० अध्यापकांनी सहभाग घेतला. डॉ. राणी शितोळे व डॉ. नरसिंग गिरी यांनी कर्यशाळेबाबत भावना व्यक्त केल्या. उपप्राचार्या डॉ. शुभांगी औटी, प्रा. डॉ. गंगाधर सातव, प्रा. नीता कांबळे, प्रा. विशाल झेंडे, प्रा. प्रतिक कामठे, प्रा. नेहा साळुंखे, प्रा. अजिनाथ डोके, डॉ. विवेकानंद टाकळीकर, प्रा. गौरव शेलार, प्रीती पाटील, प्रा. मधुमंजिरी ओक, प्रा. ऋषिकेश मोरे, प्रा. गणेश औटे, प्रा. माहेश्वरी जाधव, तृप्ती पवार यांनी कार्यशाळेचे संयोजन केले.

### माध्यम साक्षरतेची गरज...

आजचा युवा वर्ग मोठ्या प्रमाणावर सोशल मीडियाचा वापर करतो. त्यामुळे राजकीय पक्षांनाही याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. सोशल मीडियाचा प्रचारासाठी वापर वाढला आहे. सोशल मीडियावरील माहिती योग्य की अयोग्य? हे पडताळण्यासाठी माध्यम साक्षरतेची गरज आहे, असे पुणे विद्यापीठाचे प्रमुख प्रा. डॉ. माधवी रेड्डी यांनी सांगितले.



राष्ट्र सह्याद्री
गुरुवार, दि.९ मे २०२४ | अहमदनगर | पान नं. ८



# लोकसभेचे राजकीय बोल

## गोपीनाथ मुंडेंचा अनुभव माझ्यापेक्षा मोठा : नरेंद्र मोदी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बीड** : स्व.गोपीनाथराव मुंडेंची नुसती आठवण नव्हे तर विकास सेवेचा माझ्यापेक्षा त्यांना मोठा अनुभव होता. म्हणुनच मी २०१४ ला सोबत दिल्लीला घेवुन जाण्यासाठी आलो होतो असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बीडमधिल आंबेजोगाईत विराट सभेला आवाहन केले. या सभेत पंतप्रधानांनी बेटी पंकजा असे म्हणत स्व.मुंडे साहेबांचे स्वप्न पुर्ण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर देवुन टाकली. सभेला मिळालेल्या अभुतपुर्व प्रतिसादानंतर विजय संकल्पाची सभा निर्णायक ठरली.

या मतदारसंघातली राजकिय लढाई अंतिम टप्यात असताना विकासाचा मुद्दा हाच खर्या अर्थाने प्रभावी ठरताना दिसत आहे. म्हणुनच की काय महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडेंना सर्व स्तरातुन पाठिंबा वाढतोय. मागच्या पंधरा दिवसात निवडणुक लढवताना मतदारांच्या समोर जाणार्या पंकजाताईनं जनतेसमोर मांडलेली भुमिका ज्यात विकास आणि विकास, जातीपातीच्या पलीकडे जावुन आपल्या जिल्ह्याचे भाग्य बदलण्यासाठी मला एकदा संधी द्या हे लोकांच्या समोर मांडल्यानंतर



खर्या अर्थाने जनमत त्यांच्या बाजुने वर्तमान परिस्थितीत ६०टक्यापेक्षा अधिक झुकल्याचे लक्षात आले. त्यातच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी अंबाजोगाईत उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या विजयासाठी संकल्प सभा घेतली. एवढेच नव्हे तर ०४ जुन रोजी तिसर्यांदा पुन्हा देशाचे सुत्र हाती घेताना बीड जिल्ह्यातील माय-बाप जनतेचे आशिर्वाद हवेत हे मनात ठेवुन मनोहर अंबानगरीला पंतप्रधान येवुन गेले. माता योगेश्वरी, प्रभु वैद्यनाथाचा आशिर्वाद विजयी संकल्पासाठी त्यांनी जाहिर मागितला. सभेला अभुतपुर्व प्रतिसाद मिळाला. दस्तुरखुद्द पंकजाताई असो किंवा पालकमंत्री धनंजय मुंडे असो यांना देखील एवढी मोठी सभा होईल कदाचित असं वाटलं नसावं. कारण लाखाची क्षमता असलेले मैदान १०० टक्के कमी पडलं. परिणामी दहा हजार पेक्षा मतदार जनता मैदानाबाहेर उभी होती. कारण जागा अपुरी पडली. पक्षाचे युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या खांद्यावर सभेची सर्वस्वी जबाबदारी होती. चोखपणे पार पाडत त्यांनी सभाच सक्सेसफुल करून दाखवली. या सभेच्या निमित्ताने काही सकारात्मक गोष्टीचा ऊहापोह निश्चितच झाला. या मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी संपुर्ण निवडणुक जातीपातीचा रंग लावत लढवण्यावर भर दिला. मात्र यावर विश्वास ठेवु नका. आम्ही मराठा समाजाला १०टक्के आरक्षण दिलं. सगेसोयरे असो किंवा टिकणारे आरक्षण असो ते राज्य सरकार निश्चित देईल हा शब्द दस्तुरखुद्द राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे देवुन गेले. तुतारीच्या नादी लागु नका, बीडाच्या जनतेने तिला उचलुन फेकुन द्यावे आणि इथे कमळ फुलवावे असे आवाहन देखील मुख्यमंत्र्यांनी केले. पक्षाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी भाषणात स्व.गोपीनाथराव मुंडेंची आठवण काढण्यावर थांबले नाहीत तर कार्यकर्त्यांच्या भुमिकेत येवुन त्यांनी स्वत: अमर रहे, अमर रहे मुंडे साहेब अमर रहे घोषणा देत उपस्थितांच्या मनात राष्ट्रभक्तीची ज्योत पेटवली. केंद्रिय मंत्री रामदासजी आठवलेंनी मुंडे साहेबांमुळेच आपण महायुतीसोबत आलो. सोडुन गेले उद्धव ठाकरे, तरी खरी शिवसेना सोबत असल्याचा आवर्जुन उल्लेख केला. पंकजाताई गोरगरिबांच्या कल्याणाचं नेतृत्व असुन तळातल्या जनतेसाठी कठोर परिश्रम करणार्यापैकी त्यांना बीड जिल्ह्यातील दिनदलित, गोरगरिबांनी प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. कृषीमंत्री धनंजय मुंडेंनी आपल्या भाषणात उपस्थित जनसमुदायांची मने जिंकताना नेहमीच्या स्टाईलमध्ये विरोधकांचा समाचार घेतला. स्वत:ला कृषीपुत्र म्हणवुन घेणार्या विरोधी उमेदवारांची शेती कशाची आहे हे त्यांनी अप्रत्यक्ष केज शहरात काही दिवसापुर्वी दोन कोटी रूपायाचं चंदन तस्करी पकडली. तो धागा देत तुम्हीच ओळखा आता असा उमेदवार पाहिजे का क्षमतावान असलेला पंकजाताईसारखा नेता पाहिजे.

### खासदाराच्या डोक्यावर पंतप्रधानाचा हात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जाहिर सभेचे बहारदार सुत्रसंचालन जिल्ह्याच्या खा.डॉ.प्रितमताई मुंडेंनी केले. मात्र ज्या प्रितमताई मागच्या दहा वर्षापासुन नरेंद्र मोदी यांच्या सहवासात काम करत होत्या, त्याचीच आठवण म्हणुन की काय भाषण झाल्यानंतर स्वत: नरेंद्र मोदी व्यासपीठावर प्रितमताईच्या दिशेने येत कैसे हो हमारे पीएम? हे शब्द उच्चारत त्यांच्या डोक्यावर हात ठेवत आशिर्वाद दिले. त्यांनी चांगलं सुत्रसंचालन केल्याचे कौतुक पंकजाताई मुंडेंनी स्वत: केले.

## ‘नगर दक्षिणमधून विखे तर शिर्डीतून लोखंडे विजयी होतील’

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : सहकाराचा पाया रचून ग्रामीण भागात तसेच शहरी भागात दूरदृष्टी विकासात्मक धोरणे हाती घेणारे लोकनेते स्व.बाळासाहेब विखे यांचे नातू भाजपाचे खा.सुजय विखे यांनी आजोबांच्या पावलावर पाऊल ठेवून तरुणाचे ताईत बनलेल्या विखे यांनी राज्याच्या ,जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करणे व आपल्या जनतेच्या सेवेसाठी तत्पर असतात देशाचे पुन्हा एकदा पंतप्रधान पद मोदींसाठी नगर दक्षिण व उत्तर जिल्हा मतदारसंघ भाजपा सेना हट्रिक साधणार असल्याचे मत शनेश्वर देवस्थानचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी उदयकुमार बल्लाळ यांनी व्यक्त केले.तसेच शिर्डी लोकसभा मतदार संघातून निवडणूक रिंगणात असणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेना गटाचे खा.सदाशिव लोखंडे यांच्याकडे पंतप्रधान मोदींची पायाभूत केलेली विकासाची मोठी कामे दृष्टी क्षेपात असल्याने लोखंडे यांचाही विजय सुकर झाला आहे.दोन्हीही भाजप - शिवसेना उमेदवार विजयाची पताका खांद्यावर घेऊन पुन्हा एकदा पंतप्रधान मोदींची लाट दाखऊन देतील यात शंका नाही असा निर्वाळा देत नेवासा येथील श्री.संत ज्ञानेश्वर मंदिर विकासासाठी राज्याचे मुखयमंत्री एकनाथ शिंदे यांनी या बाबत निधीही कमी पडू देणार नाही असे आश्वासन देत विकास पूर्ण करीन मात्र तो मुद्दा पाठी माघे पडल्याची खंत बल्लाळ यांनी व्यक्त केली.तरीही देशाच्या सुरक्षेसाठी अभूतपूर्व यश मिळून विखे व लोखंडे विजयी च होतील असे मत बल्लाळ यांनी व्यक्त केले.

## दुचाकी स्वाराला अज्ञात वाहनाची धडक, पत्नी ठार तर पती गंभीर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील गुहा गावात नगर मनमाड रोड जवळ असलेल्या माऊली डेअरी समोर दुचाकीस्वार पती- पत्नी बहिणीकडे जागरण गोंधळाची पहाटेची आरती करून कामावर जात असताना पाठीमागून येणाऱ्या अज्ञात वाहनाची जोरात धडक बसल्याने दोघेही गंभीर जखमी झाले.

तत्काळ जखमींना रुग्णालयात दाखल केले असता दुचाकी वरील पत्नीचा मृत्यू झाला तर पतीची प्रकृती चिंताजनक आहे.गुहा येथे मेजर सोनवणे यांच्या घरी जागरण गोंधळाचा कार्यक्रम असल्याने भाऊ आपल्या बहिणीच्या घरी आपल्या पत्नीसह आला होता. पहाटेची आरती झाल्यावर कामावर जाण्यासाठी येथून नगर मनमाड रोडने दुचाकी एम एच १७ सी ५१६५ या दुचाकीवरून जात असताना पाठीमागून येणाऱ्या वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली व त्यात पती-पत्नी गंभीर जखमी झाले. धडक दिल्यानंतर धडक देणारे वाहन अपघात स्थळावरून ताबडतोब फरार झाले. रस्त्यावर पडलेल्या जखमींना उपचारासाठी वेळेवर कोणी मदत केली नाही. तेथे जवळच असलेले साई सिताराम हॉटेल मधील मालक ऋषिकेश कोळसे, शशी कोळसे, संजय पांढरे, राजू उहें, सतीश गायकवाड यांनी धाव घेतली व जखमींना बेशुद्ध अवस्थेत रवी देवकर यांच्या ॲम्बुलन्स मध्ये रुग्णालयात पाठवले. दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना अहमदनगरला हलविण्यात आले. परंतु औषध उपचारापूर्वीच मिराबाई केशव केदार वय वर्षे ५९ या महिलेचा मृत्यू झाला तर तिचे पती केशव मारुती केदार वय वर्ष ६५ यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजले आहे. घटनेच्या ठिकाणी पोलीस कॉन्स्टेबल बाबासाहेब शेळके यांनी दाखल होऊन जखमींची विचारपूस करत पंचनामा केला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

## अपक्ष उमेदवार ॲड.सिद्धार्थ बोधक यांचा विजयाचा दावा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : शिर्डी लोकसभा मतदारसंघाची निवडणूक जाहीर झालेली असून प्रचारात रंगत भरू लागलेली आहे.

सदर निवडणुकीमध्ये ॲडव्होकेट सिद्धार्थ बोधक हे उमेदवारी करीत असून त्यांचे चिन्ह हे रोड रोलर आहे. ॲड.बोधक यांना तळागाळातील जनतेच्या विविध प्रश्नांची जाण असून त्या अनुषंगाने त्यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. विविध स्तरातील जनतेचा ॲड.बोधक यांना पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे ॲड.बोधक यांनी सदर निवडणुकीत विजयी होण्याचा दावा केलेला आहे.

समाजातील प्रश्नांची जाण तसेच ते स्वतः वकिली व्यवसाय करीत असल्याने वकील बंधूंचे असलेले विविध प्रश्न याबाबत लक्ष घालून ते सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याबाबत ॲड.बोधक यांनी प्रचारादरम्यान सांगितले. त्यामुळे अपक्ष उमेदवार ॲडव्होकेट सिद्धार्थ दिपक बोधक यांचे रोडरोलर या चिन्हावर भरघोस मतदान करावे व विजयी करावे, असे आवाहन ॲडव्होकेट बोधक व मित्र परिवाराने केलेले आहे.

## देशाला नरेंद्र मोदींशिवाय पर्याय नाही : खा.डॉ.सुजय विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव** : उभा देश म्हणतोय की देशाला मोदींशिवाय पर्याय नाही. खा. डॉ. सुजय विखे यांच्या माध्यमातून नगर जिल्हा हा देशातील पहिल्या १० प्रगत जिल्ह्यात आल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. ते शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील महायुतीच्या प्रचार सभेत बोलत होते.

अहिल्यानगर दक्षिण लोकसभा निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथे महासभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह आमदार मोनिकाताई राजळे, चंद्रशेखर घुले, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहटा, दत्ताभाऊ पानसरे, नंदू मुंडे, अरूण मुंडे, एकनाथ खटाळ, काकासाहेब ननावरे, राहुल देशमुख आणि इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी सभेला मार्गदर्शन करताना मंत्री मुंडे म्हणाले की, मोदी साहेब देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान होताना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणाऱ्या उमेदवाराच्या प्रचारासाठी आल्याचा आनंद होत आहे.२०१४ मध्ये देश दिवाळखोरीत निघाला असताना नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पदाची धुरा सांभाळत १० वर्षात इतके काम केले की, देशाची अर्थव्यवस्था ५ व्या क्रमांकावर आणुन ठेवली आहे. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जगात देशाची इतकी पत आणि प्रतिष्ठा वाढली आहे की, आपल्या देशाबद्दल जर इतर देशातील मंत्रीमडळातील एखाद्या नेत्याने ब्र जरी काढला तरी त्या देशाचा पंतप्रधान त्या नेत्याचा राजीनामा घेतो. आज ही ताकद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आहे. यामुळे जर देश सुरक्षित आणि विकसित ठेवायचा असेल तर मोदींशिवाय देशाला कोणताही पर्याय नसल्याचे त्यांनी सांगितले.या प्रसंगी त्यांनी विरोधकांचा सुद्धा चांगलाच समाचार घेतला. त्यांनी सांगितले की, ७० वर्षात ज्यांनी सत्ता भोगली त्यांनी केवळ लोकांची फसवणूक केली. तर पंतप्रधान मोदी यांनी ८० टक्के लोकांना मोफत राशन देवून त्यांची भूक भागवली आहे. विरोधी उमेदवारावर बोलताना मंत्री मुंडे म्हणाले की, जो पोलिसांचा बाप काढतो तो उद्या निवडून आल्यावर तुमचा बाप काढायला सुद्धा कमी करणार नाही. पारनेर तालुक्याने जी चुक केली ती चुक आता तुम्ही करू नका असे आवाहन त्यांनी केले.मुंडे यांनी महायुती आणि मोदी सरकारच्या माध्यनातून शेतकरी, महिला, तरुणांना, औद्योगिक क्षेत्राला विविध माध्यमातून झालेल्या फायद्यांची माहिती देत डॉ. सुजय विखे यांनी केलेल्या विकास कामांची माहिती दिली. त्याच बरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या नेतृत्वाखाली खा. विखेंच्या माध्यमातून नगर जिल्हा देशातील सर्वात विकसित १० जिल्हा म्हणून नावारुपाला येईल अशी खात्री दिली.

## राजकारणातला सुसंस्कृतपणा देवेंद्र फडणवीसांनी संपवला : सुषमा अंधारे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : सर्वांना माहीत आहे देवेंद्र फडणवीस यांनी हा महाराष्ट्र नासवला अवघ्या महाराष्ट्राला २५ वर्षे मागे नेलं त्यांच्या मुळे महाराष्ट्राचा राजकीय स्तर कमालीचा खाली आला राजकारणातला सुसंस्कृतपणा जर कोणी संपवला असेल तर तो देवेंद्र फडणवीस यांनी संपवला आणि नुसता सुसंस्कृतपणा संपवला नाही तर अवघ्या भारताचा इतिहास सांगतो की जेवढे लोक भाजपाने आज पर्यंत सोबत घेतले त्या प्रत्येकाला संपवायचे काम केले.





लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गंगापूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या प्रचार सभेला शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले.यावेळी लोकसभा समन्वयक प्रदिप खोपडे,महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे, उपजिल्हाप्रमुख लक्ष्मण सांगळे, अविनाश पाटील, अंकुश सुंब, वाल्मीक शिरसाठ, विश्वजीत चव्हाण, कॉंग्रेसचे विजय मनाळ, लक्ष्मण भुसारे, सुर्यकांत गरड,,भारत तुपलोंढे, जिल्हा परिषदेच्या माजी. अध्यक्षा देवयानी डोणगावकर डॉ आबासाहेब सिरसाट,दलीत आघाडीचे मारोती साळवे, तालुका प्रमुख दिनेश मुथा, सुभाष कानडे यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना शिवसेनेच्या ऊपनेत्या अंधारे म्हणाल्याभ्रष्टाचा-यासाठी भाजप कचरा कुंडी झाली आहे,त्या कचरा कुंडीत भ्रष्टाचाराने बरबटलेल्या नेत्यांना आयात करुन पक्ष फोडीचे राजकारण सध्या सुरू आहे. दारु विकणा-याला लोकसभेत पाठवणार काय असा सवाल उपस्थितांना विचारताच सर्वांनी हात वर करून नाही पाठवणार असा इशारा केला.जाहिरातीचे युग सध्या सुरू आहे, जाहिरात ही वाईट गोष्टी ची होते त्यामुळे मोदी सरकारने जाहिराती करून जनतेची फसवणूक करीत आहे.फडणवीसांनी जातीपातीचे राजकारण करत ओबीसी व मराठ्यांमध्ये भांडण लावण्याचे काम केल्याचे सुषमा अंधारे यांनी सांगितले.

## वैजापूर, गंगापूरकरांचे बादली आंदोलन

### नांदूर मधमेश्वरमधून पाणी न सोडल्यास मतदानावर बहिष्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : नांदूर मधमेश्वर जलदगती कालव्यातून तात्काळ पाणी सोडण्यात यावे या मागणीसाठी आधार शेतकरी जलदूत समितीच्या माध्यमातून वैजापूर व गंगापूर तालुक्यातील शेतकरी व महिलांनी तीन मे पासून आंदोपण सुरु केले आहे. या आंदोलनाचा भाग म्हणून बुधवारी या दोन्ही तालुक्यातील शेतकरी व महिला यांनी वक्ती गावातील कालव्यात उतरून बादली आंदोलन केले.



समितीचे अध्यक्ष पंडित अण्णा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सोन्याबापू सिरसाठ, रामचंद्र पिलदे, योगेश तारू, सचिन गायकवाड, मंदा न्हावले आदिसह शेकडो शेताकरी व महिला या आंदोलनात सहभागी झाल्या असून दहा मे पर्यंत कालव्यातून पाणी न सोडल्यास १३ मे रोजी होत असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार घालू, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.दरम्यान, नांदूर मधमेश्वर कालव्याचा देय कोटा तीन हजार ११८ दशलक्ष घनफूट पाण्याचा वापर झाल्याने व गोदावरी कालव्याचे मे महिन्याचे प्रस्तावित आवर्तनासाठी जेमतेम पाणी साठा शिल्लक असल्याने मागणीनुसार कोणताही पाणी पुरवठा करणे शक्य नसल्याचे पाटबंधारे विभागाने आंदोलकांना कळवले आहे त्यामुळे आंदोलकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. पाटबंधारे विभागाने हे प्रकरण धोरणत्मक निर्णय घेण्यासाठी शासनाकडे पाठवले आहे. शासनाच्या निर्देशांनंतरच कालव्यातून पाणी सोडण्याची कार्यवाही करण्यात येईल असे पाटबंधारे विभागाने स्पष्ट केले आहे.

## मालक व नोकराकडून छेडछाड; विवाहितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी फॅक्टरी येथील नगर मनमाड महामार्गलगत असलेल्या एका बड्या किराणा दुकानाच्या मालकासह एका कामगाराने याच किराणा दुकानात काम करणाऱ्या एका विवाहित महिलेची छेडछाड केल्याने या त्रासाला कंटाळून सदर महिलेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

या घटने संदर्भात समजलेली माहिती अशी की, राहुरी फॅक्टरी येथील नगर मनमाड मार्गालगत असलेल्या किराणा दुकानात एक विवाहित महिला अनेक दिवसांपासून काम करीत आहे.सदर महिला काम करत असताना किराणा दुकानाचा मालक व किराणा दुकानातील एक कामगार तिच्याशी वारंवार अंगलगट करत होते.याबाबत त्या महिलेने अनेक वेळा विरोध केला होता मात्र या दोघांचे त्या महिलेची छेडछाड करण्याचे कारनामे सुरूच होते. त्यामुळे रोजच्याच या त्रासाला कंटाळून सदर विवाहित महिलेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असून तिच्यावर राहुरी फॅक्टरी येथील एका रुग्णालयात उपचार सुरू आहे.

सदर महिलेने याबाबत माध्यमांना मुलाखत दिली असून त्यात म्हटले आहे की, सदर किराणा दुकानाचा मालक व एक कामगार काम करत असताना माझ्याजवळ येऊन नको त्या ठिकाणी हात लावून सातत्याने अंगलगट करीत होते.

दरम्यान या किराणा मालकाचे अनेक कारनामे यापूर्वीही उजेडात आले आहे .मात्र राजकीय हस्तक्षेप करून प्रकरणावर पडदा टाकण्यात येत होता. या महिलेने कुठलीही तक्रार करू नाही म्हणून पुन्हा एकदा राजकीय दबाव टाकून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न सुरू आहे मात्र आम्हाला न्याय मिळालाच पाहिजे अशी मागणी पीडित महिलेच्या कुटुंबाकडून होत आहे या किराणा दुकानातील कामगाराने यापूर्वीही याच ठिकाणी काम करणाऱ्या महिलेशी असेच कृत्य केल्याने सदर महिलेच्या पतीने आत्महत्या करून आपली जीवन यात्रा संपवली होती. किराणा दुकान मालक व कामगार यांच्यावर पोलिसांनी कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी पीडितेच्या कुटुंबियांनी केली आहे.

## बीड लोकसभा मतदारसंघात विकासाचं अस्त्र ठरु लागलं प्रभावी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बीड** : लोकसभा मतदारसंघात निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्याकडे वळत असुन तिरंगी लढतीच्या सामन्यात विरोधकांनी हाती घेतलेले जातीच्या राजकारणाचं अस्त्र खर्या अर्थाने निकामी होताना दिसत आहे. महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडेंनी सुरूवातीपासुन मांडलेली सकारात्मक राजकारणाची भुमिका तथा विकासाचं राजकारण यालाच आता खर्या अर्थाने प्रतिसाद वाढला असुन सद्यस्थितीत पंकजा वादळाने संपुर्ण मतदारसंघ घेरला दिसल्याचे चित्र पुढे येवु लागले. किसान पुत्राची शेती नेमकी कशाची?हे पोलीस कारवाईत उघडकीस आल्यापासुन या निवडणुकीत जातीपातीचा आधार घेण्याचा प्रयत्न करणार्या उमेदवाराचा खरा चेहराच समोर आला. ज्यामुळे सामान्य माणसाला पंकजाताईसारखं नेतृत्व आपण दिल्लीला पाठवलं तर जिल्ह्यांच भाग्य निश्चित उजळु शकतं. देशाचे पंतप्रधान बेटी पंकजा हे शब्द उच्चारताच तेव्हा भविष्यात हीच लेक त्यांची वाढलेली ताकद विकासाच्या पार्श्वभुमीवर जमेची बाजु याची खात्री लोकांना पटली.



या मतदारसंघात तिरंगी लढतीचा सामना होत असताना वंचित पक्षाकडून निवडणुक लढवणारे अशोक हिंगे यांनी देखील सर्वत्र आघाडी घेतलेली दिसते. लोक खर्या अर्थाने बजरंग सोनवणे आणि अशोक हिंगे यांच्यात देखील तुलना करताना दिसतात. ज्या अशोक हिंगेंनी मराठा आरक्षणासाठी मागच्या पंधरा-वीस वर्षात अनेक आंदोलने, उपोषणे रस्त्यावर उतरून संघर्ष केला. तर दुसर्या बाजुने महाविकास आघाडीकडून निवडणुक लढवणारे बजरंग सोनवणे आरक्षणाच्या प्रश्नावर लोकांना कधीही रस्त्यावर दिसले नाहीत. बर्यापैकी हा विचार पुढे येताना दिसत असल्याने अशोक हिंगे यांचे पाठबळ देखील वाढलेले लक्षात येते.

विशेष म्हणजे महायुतीची उमेदवारी जाहिर झाल्यापासुन पंकजाताई मुंडेंनी या मतदारसंघात आष्टी, पाटोदा, शिरूर, बीड, गेवराई, वडवणी,माजलगाव, केज, परळी, अंबाजोगाई, धारूर तालुक्याचा झंझावती दौरा करत मतदार जनतेच्या समोर जावुन त्यांनी फक्त विकासाची भुमिका मांडली.

जिल्ह्यात असं एक गाव नाही जिथे पंकजाताईचं काम नाही. निवडणुक प्रचारात त्या जेव्हा फिरतात त्यावेळी मतदार माय-बाप सांगतात की, ताई तुमच्यामुळे आमच्या गावाला ही योजना आली. यापेक्षा राजकिय नेतृत्वाला दुसरी साक्ष कोणतीच असु शकत नाही. जिल्हावासियांनी पंकजाताईचं राजकारण एकुण जवळुन पाहिलेले आहे. त्यांच्या पोटात कुणाविषयी कधीही पाप नसतं, सुडाचं राजकारण त्या कधी करत नाहीत. सर्वसमावेशक राजकारण हा त्यांचा मानवतावादी धर्म आहे. माणसं आडवा, त्यांची जिरवा या प्रयोगापासुन स्वत:ला नेहमीच त्यांनी दुर ठेवले. समाजातील वंचित,उपेक्षित, दीनदलित, कष्टकरी माय-बाप जनतेच्यासाठी सेवक म्हणुन रात्रंदिवस त्यांनी केलेले काम याचि देहि, याचि डोळा आपल्या जिल्ह्यातील लोकांना दिसते आहे. त्यांच्याकडे विकासाचं व्हिजन असुन आपण मतदारांनी कुठल्याही परिस्थितीत त्यांनाच निवडुन द्यायला हवं अशा भावना सामान्य जनतेच्या मनात पुढे आल्याने ही निवडणुक खर्या अर्थाने जातीच्या मुद्याहुन विकासाच्या मुद्यावर अंतिम टप्यात दिसुन आले. म्हणुन तिरंगी लढतीत पंकजा नावाचं वादळ संपुर्ण जिल्ह्यात पसरलं असुन कमळाची हवा तयार झाल्याने आता जातीपातीच्या पलीकडे जावुन लोक विकासाच्या राजकारणाकडे पाहु लागले. परिणामी पंकजाताईला पाच वर्षे संधी देण्याचा जणु काही निर्धारच सामान्य लोकांनी केल्याचे लक्षात जिल्हाभरात येवु लागलं. विकासाचं अस्त्र आता प्रभावी ठरत असल्याने जातीपातीचं शस्त्र निकामी होताना नव्हे तर निवळताना दिसायला लागले आहे.